कोर्ट लॉकअप इन्चार्ज यांनी आमचें ताब्यात दिले आहे....त्रुटी अनियमितता याचा शासन परिपत्रकातील तरतुदी नियमावली व मार्गदर्शक तत्त्वे अप्पर पोलीस आयुक्त प्रशासन यांचेकडे रीतसर मांडून त्याचा विचार झालेला नसल्याने सदरची गंभीर अनियमितता आपल्या दृष्टिपथास आणीत आहे. विभागीय चौकशी अधिकारी यांनी त्याचे समाकलन अहवालमध्ये नमुद केलेल्या मताशी मी अजीबात सहमत नाही कारण नमुद चौकशीतील सर्व सरकारी साक्षीदार व जादाचे सरकारी साक्षीदार यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, मी येरवडा जेलमधुन आरोपी दिपक पाटील व विशाल शिंदे यांना काढलेले नाही. तसेच येरवडा जेल प्रशासन कर्मचारी पो हवा लोंढे व पोलीस शिपाई चौधरी यांनी दिनांक ०३/११/२०१८ रोजी पो ना १९५० नेवसे याचे ताब्यात ३९ आरोपी दिले होते कोर्ट नं ९ चे दोन आरोपी विशाल शिंदे व दिपक पाटील यांना आणण्यात आले होते सदर बाबत येरवडा जेलकडील पत्र क्रमांक येमका/मा अनि २००५/३६७७/२०१९ दिनांक २०/०८/२०१९ कळविले आहे. त्याची छायाकीत सत्य प्रत सोबत सादर केली आहे. त्यामुळे सदर आरोपीस मी स्वताहुन जेल मधुन काढलेले नाही सदरची बाबत विभागीय चौकशीत चौकशी अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन देण्यात आली होती. असे असताना देखील चौकशी अधिकारी यांनी न्यायाची बाजू मांडणे उचीत होते परंतु त्यानी सदर दोषारोपा बाबत मौन बाळगुन दोषारोपास पृष्ठी देण्याची भूमिका घेतली आहे. व सत्यपरस्थिती लपवलेली असल्याचे सिध्द होत आहे. आरोपी दिपक पाटील यांस आम्ही परस्पर त्याचे राहते घरी घेवुन गेलो हा जो निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढलेला आहे तो मला अजिबात मान्य नाही. कारण आरोपी दिपक पाटील यांनी कोर्ट नं ९चे मा न्यायालं यांना विनंती केली होती की, माझी पत्नी आजारी असल्याने मला तीला भेटायचे आहे तरी आपण मला परवानगी दयावी अशी विनंती केली होती त्यावेळीस आरोपीस तुमच्या वकिला मार्फत लेखी अर्ज देण्यास सांगितले व कोर्ट जेवणासाठी उठुन गेले त्यावेळी न्यायालयानी त्याची विनंती मान्या केली आहे असा आमचा समज झाल्याने व आरोपी दिपक पाटील हा आम्हास वारंवार विनंती करत होता की मला माझ्या आजारी पत्नीस भेटण्यास घेवुन चला असे म्हणत होता. म्हणुन आम्ही कोर्ट आवारातील मुख्यालयाकडील पोलीस अधिकारी याच्या निदर्शनास सदर बाब आणुन त्याची परवानगी घेण्यासाठी कोर्ट आवारात आलो असता पोलीस निरिक्षक भोसले व मपोउप निरिक्षक थोरात हे तेथे हजर नसल्याने स्टेशन डायरी मध्ये पोनि भोसले हे दिनांक ३/११/२०१८ रोजी १५/३० वा नोंद क्र २५ येथे शिवाजीनगर कोर्ट कंपनी येथे हजर झाले म्हणुन नोंद आहे. व मपो उप निरिक्षक स्नेह थोरात या दिनांक ३/११/२०१८ रोजी नोंद क्र २८ मुख्यालयातील कामसंपवुन चक्कर येवु लागल्याने दुपारी ०१/३० वा निवास्थानी गेल्याची नोंद आहे. त्याची सत्य प्रत सोबत जोडली आहे. डीओ शेवाळे याचेकडे सदर आरोपीस घेवून गेलो होतो कारण डीओ शेवाळे यांचे यांचे तोडी आदेशाप्रमाणे कोर्ट कंपनीचे दैनदिन कामकाज चालते म्हणुन आम्ही डीओ शेवाळे यांना सदरची हकिगत कथन करुन व समक्ष आरोपीने डी ओ शेवाळे यांना विनंती केल्याने शेवाळे यांनी तोंडी परवानगी दिल्याने आम्ही नमुद आरोपीस त्याचे राहते घरी घेवून गेलो होतो आरोपी पळुन जावुन नये म्हणुन पो शि पाटील याचे हातात बेडीची एक बाजु व दुसरी आरोपीच्या हातात आडकविण्यात आली होती तसेच रस्सीने देखील बाधण्यास आली होते वरील सर्व घटना सरकारी साक्षीदार व जादाचे साक्षीदार यांनी देखील विभागीय चौकशी दरम्यान साक्षीमध्ये कथंन केलेले आहे. असे असताना देखील चौकशी अधिकारी यांनी मी वरील आरोपीस त्याच्या राहते घरी परस्पर घेवुन गेला हा काढलेला निष्कर्ष चुकीचा आहे तरी आपण मी वरील प्रमाणे सादर केलेल्या सर्व घटनाचा बारकाईन अभ्यास केल्यास आपल्या निदर्शनास येईल की आरोपी दिपक पाटील यांस आम्ही आमच्या अधिकारात त्याचे रहाते घरी घेवुन गेलेलो नव्हतो हे सिध्द होत आहे. विभागीय चौकशीत माझ्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपात दिनांक, वेळ, व्यक्तीचा तपशील नमूद नाही. १] अपचारी यांना येरवडा कारागृहातून एक आरोपी काढण्यास कोणी लेखी आदेश दिले.२] आरोपीचे नाव काय आरोपी कोणत्या गुन्ह्यातील आहे.३] त्यास कोठे हजर करायचे.४] तसेच प्रत्येक्षात येरवडा कारागृहातून अपचारी यांनी किती व कोणा आरोपीस बाहेर काढले याचा कसलाही तपशील नाही. विभागीय चौकशी नियम १९८१ मधील परिच्छेद ६ मधील नियम ६.४ [अ] [ब] [क] [ड] चा पूर्णपणे भंग झाला आहे. आणि असा मोघम दोषारोप सिद्ध झाल्याचा अनुमान काढून टोकाची शिक्षा देणे हि नैसर्गिक न्यायतत्वाची पायमल्ली आहे, तसेच दोषारोप हा

नौवम नसावा आणि त्या वर आधारित शिक्षा नियम विरुद्ध आहे या अनियमिततेचा लाभ अपचारी यांना मिळावा. ३] निलंबित कर्मचाऱ्यांची तीन महिन्यात दोषारोप बजावणे आवश्यक आहे व त्यापुढे त्यांना निलंबनाच्या ठेवता येणार नाही असे महाराष्ट्र शासनाचे आदेश आहे, त्याचा भंग झाला आहे. माझा वरील दोषारोपातील कथित घटना दिनांक ०३/११/२०१८ असल्याने तेव्हा पासून सेवेतून निलंबित करण्यात आले मात्र प्रत्यक्षात विभागीय चौकशी दिनांक ०९/०७/२०१९ रोजी आदेशित होऊन मला दोषारोप ऑगस्ट मध्ये बजावण्यात आले. तरीही निलंबन केल्या पासून ३ महिन्यात दोषारोप बजावण्यात आले नाही. ९ महिने विलंब लावला मात्र शासन नियम व परिपत्रक अर्ज सोबत देऊन सुद्धा निलंबन रद्द केले नाही, व कर्तव्यावर हजर करून घेतले नाही. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडे परिपत्रक क्र नियम क्र आ/११२८/प.क्र. ११/११अ दिनांक ०९/०९/२०१९ मधील शासन निर्णयास हरताळ फासला तसेच सन्माननीय सर्वोच्च न्यायालय दिल्ली कडील न्यायनिवाडा अजयकुमार चौधरी विरुद्ध भारत सरकार सिविल अपील नंबर १ निलंबित कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी कोणत्याही परिस्थितीत ६ महिन्यात पूर्ण होणे आवश्यक आहे आणि त्यापुढील मुदतवाढ गृहविभाग मंत्रालय, मुंबई कडून घेणे आवश्यक असताना व आमच्यावर कोणताही गुन्हा दाखल नसताना अप्पर पोलीस आयुक्त प्रशासन यांनी गंभीर नियमबाय्यता केली आहे, अपचारी यांना निलंबनातून ३ महिन्या नंतर पुनर्स्थापित केलेले नाही व सक्षम अधिकाऱ्या कडून मुदतवाढ घेतलेली नाही. विभागीय चौकशी नियम १९९१ मधील प्रकरण ३ मधील कलम ३ मधील १९ नुसार विभागीय चौकशी ६ महिन्यात पूर्ण होणे आवश्यक होती. तसेच पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई कडील परिपत्रक क्र. पोमस ११/२२/०६/२५२/२०१२ दिनांक-१०/०२/२०१६ मधील तरतुदीचा भंग झाला असल्याने त्याचा लाभ मला मिळावा. ५] अप्पर पोलीस आयुक्त प्रशासन पुणे शहर यांनी शिक्षे च्या आदेशापूर्वी सुनावणी (आज्ञांकिक कक्ष) दिली, मात्र आम्हाला आमचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही दिनांक ०६/०२/२०२० रोजी आज्ञांकिक कक्ष घेण्यात आला व माझ्या १९ वर्ष केलेल्या खडतर सेवेचा व मिळालेल्या बक्षिसाचा थोडापण विचार करण्यात आला नसून आम्हाला विभागीय चौकशीच्या अहवालाचा कोणताही अभ्यास न करता जाणुन बुजुण त्याच दिवशी बडतर्फ करण्यात आले व जीवनातून माझे कुंटुब व मला उठवणारी शिक्षा दिली. शिक्षेच्या अंतिम आदेशापूर्वी मला सुनावणी दिल्याचे आभास करण्यात कारण प्रत्यक्षात माझे म्हणणे ऐकून घेतले नाही. माझ्या सेवेच्या कालावधीचा कोणताही विचार केला नाही अशा प्रकारे महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मुंबई कडील परिपत्रक पीडीई/०८९८/७०९/पोट कलम-६बी दिनांक २०/१०/१९९८ मधील सूचना नजरे आड करून शिक्षा दिली. ६]माझे ताब्यातील आरोपी नामे दीपक यशवंत पाटील याची शिवाजी नगर न्यायालयात पेशी झाल्या दरम्यान त्याने कोर्टास विनंती करून आजारी पत्नीस भेटण्यास परवानगीस्तव विनंती केली होती मा. कोर्टाने त्यास त्यांच्या वकीलमार्फत अर्ज करण्यास सांगितले व आम्हाला त्याचे पत्नीस १० मिनिट भेटु दया असे कोर्टाने तोंडी सांगितले होते त्यामुळे आरोपीस आजारी पत्नीस भेटण्याची परवानगी मंजूर झाली असे वकिलाने सांगितले व सदरची हकिगत आम्ही वरिष्ठ अधिकारी हजर नसल्याने कोर्ट कंपनी डी ओ शेवाळे यांना सांगितली व आरोपीने ही कोर्टाने परवानगी दिली आहे त्याच्या पत्नीस भेटण्याची विनंती आरोपी यांनी कोर्ट कंपनी डिओ यांना केली. तसेच दिनांक ०३/११/२०१८ रोजी आरोपीस येरवडा कारागृहात जमा करण्याच्या दरम्यान त्यास पळून जाण्यास वाव मिळू नये याची पुरेपूर काळजी घेतली व त्यास बेडि रस्सीने बांधले व त्याचा मागे दक्षतेने उभा राहिलो तसेच कोर्टाने तोंडी परवानगी दिली व कोर्ट कंपनी डिओ यांनी सांगितल्याने आरोपी यास आजारी पत्नीस भेटण्यास कोथरूड येथील त्याचे निवासस्थानी अल्प काळ नेले असता कोणी तरी नियंत्रण कक्ष पुणे शहर यांना कळविल्याने अलंकार पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक शिनगारे हे त्या ठिकाणी आले त्यांनी सदरची परिस्थीती पाहिली व आम्ही त्याचे सोबत आरोपीस पोलीस स्टेशन ला घेवुन आलो एकंदरीत आरोपीस त्याचा आजारी पत्नीस केवळ कोर्टाचा तोडी आदेश व डिओ यांच्या आदेशामुळे व माणुसकी म्हणून भेटवण्यास त्यास पूर्ण जायबंदी करून नेले होते केवळ कोर्टाचा तोडी आदेश व माणुसकी मानवता दृष्टिकोनातून सदरची घटना घडली आहे. तसेच पोलीस आयुक्त कार्यालयात कर्मचाऱ्यांना मानवतावादी (भावनिक प्रज्ञावंत पोलीस) प्रशिक्षण देण्यात येते त्यातही आरोपीशी सौजन्यानं

२४

वागावे, मानवता दृष्टिकोन ठेवून वर्तन करण्याच्या वरिष्ठांचा सूचना आहेत. कोणत्याही व्यक्तीस जो पर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही तो पर्यंत गुन्हेगार म्हणता येत नाही. असे न्यायालयाचे आदेश आहे. त्यामुळे यामध्ये माझी कसलीही कसूरी नाही कारण त्यादिवशी पोलीस निरीक्षक तसेच पोलीस उपनिरीक्षक शिवाजी नगर कोर्टात दुपारी हजर नसल्याने डिओ यांनी तोंडी परवानगी दिली होती, यासंपूर्ण घटनेत माझ्यावर कोणताही गुन्हा दाखल नाही. तरी यासंपूर्ण घटनेत माझ्यावर कोणताही प्रकाराचा न्यायालयीन गुन्हा दाखल नाही. उपरोक्त कथित कसुरीचा राई चा पर्वत करून अत्यंत टोकाची कठोर शिक्षा मा. अप्पर पोलीस आयुक्त, प्रशासन यांनी दिली आहे. महाराष्ट्र शासन गृहविभाग कडील परिपत्रक क्र. पीडीई/०८९८/७०९/पोट ६ दिनांक २०/१०/१९९८ मधील कसुरीचे प्रमाणात शिक्षा/सुसंगत शिक्षा बाबत तरतुदीचा विचार झालेला नाही. मी राज्य राखीव पोलीस बल गट क्र १० सोलापुर येथे शिपाई या पदावर दिनांक २१/११/२००१ रोजी भरती झालो आहे मी सन २००४ मध्ये गट क्र २ पुणे येथे बदलुन आलो मी गट क्र २ येथे नेमणुकीस असताना कंमाडो कोर्स डी डी आय कोर्स तसेच इतर महत्वाचे कोर्स यशस्वीरित्या पुर्ण केले आहेत तसेच जिल्हा पोलीस प्रशिक्षण केंद्र नानविज दौड येथे कवायत निर्देशक म्हणुन ५ वर्षे कर्तव्य बजावले आहे. तसेच गट क्र २ येथे नेमणुकीस असताना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नक्षलग्रस्त भागात गडचिरोली चंद्रपुर गोंदिया भंडारा येथे खडतर कर्तव्य बजावले आहे तसेच महाराष्ट्रामध्ये विविध जिल्हया मध्ये महत्वाचे बंदोवस्त केलेले आहेत तसेच विविध राज्यांत निवडणुक बंदोबस्त केला आहे तसेच आता पर्यन्त मी केलेल्या चांगल्या कामगिरी बददल माझा गौरव करुन मला ३८ बक्षिसे उत्तेजनार्थ म्हणुन दिलेल आहेत. माझ्या १९ वर्षाच्या प्रदिर्घ सेवा कालावधीत मला आता पर्यन्त दोन सक्त ताकीद या शिक्षा झालेल्या आहेत मी पोलीस आयुक्तालय पुणे शहर यांचे आस्थापनेवर सन २०१६ मध्ये बदलुन आलेलो आहे मी १२ पास आहे मी पुणे जिल्हातील आंबेगाव तालुक्यातील अदिवासी भागातील रहिवाशी आहे मला शेती वगैरे काही नसुन मला नोकरी व्यतीरिक्त इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही माझ्यावर सपुर्ण घराची जवाबदारी आहे माझ्या कुटुंबात आई, पत्नी व दोन मुले असुन त्याचा संभाळ करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे आई वयोवृध्द असुन तीला दमाचा आजार आहे तीच्या आजारपणाचा खर्च मलाच करावा लागतो सध्या मी १७ महिने पासुन निलवीत असल्याने अर्थिक परिस्थीती ही माझी हालाकीची झालेली आहे. तरी वरिल नमुद केलेल्या सर्व बाबीचा सहानभुतपुर्वक विचार करुन मला दिलेली शिक्षा रद्द होऊन माझी निर्दोष मुक्तता करणेत यावी ही कळकळीची नम्र विनंती आहे. करोना आजारामुळे सुविधा उपल्बध नसल्यामुळे आवश्यक लागनारे कादपत्र व पुरावे जोडले नाही ते नंतर जोडपत्रासोबत देण्याची तजविज ठेवली आहे........ मी पोलीस आयुक्तालय पुणे शहर यांचे आस्थापनेवर दिनांक २०/०७/२०१६ मध्ये भरती झालो आहे मी दिनांक ०८/०५/२०१७ रोजी पोलीस शिपाई पदाची मुलभुत प्रशिक्षण नानाविज दौड येथे यशस्वीरित्या पुर्ण करुन मी शिवाजीनगर मुख्यालय पुणे येथे हजर झालो त्यानंतर मी ए कंपनी गार्ड डयुटीचे कर्तव्य बजावले आहे माझी सन २०१७ रोजी कोर्ट कंपनी येथे नियुक्ती करण्यात आली होती त्यानंतर दिनांक ०१/०१/२०१८ रोजी मा पोलीस आयुक्त मुख्याल पुणे शहर यांनी माझी निवड कॉऊन्टर इन्सरजेसी ऑफ अॅन्टी टेरीरीस्ट कोर्स (सी आय ए टी ) शिताबर्डी नागपुर येथे पाठविण्यात आले होते सदरचा ४५ दिवसाचा खडतर कोर्स मी यशस्वीरित्या पूर्ण केला आहे त्याचे प्रमाणपत्र मला मिळालेले आहे त्याची छायाकीत प्रत सोबत सादर करण्यात आली आहे मी विविध राज्यात आरोपी पार्टी बंदोबस्त उत्कृष्टरित्या केलेला आहे तसेच पुणे जिल्हातील कायदा व सुव्यवस्था राखणे कामी मी महात्वाचे बंदोबस्त प्रमाणीक पणे पार पाडले आहेत माझ्या सेवा काळात मला अदयाप पर्यन्त एकही शिक्षा दिलेली नाही. मी पुणे जिल्हातील शिरुर तालुक्यातील ग्रामीण भागातील रहिवाशी आहे माझे आई वडिलानी मोलमजुरी करुन मला बीए पर्यन्तचे शिक्षण दिलेले आहे माझ्या व्यतिरीक्त घरातकोणीही नोकरीस नाही त्यामुळे घराची संपुर्ण जबाबदारी माझेवरच आहे. माझे कुंटबात आई वडिल व लहान बहिण भाऊ माझ्यावरच अवलंबुन आहेत दिड वर्षापासुन मी निलंबीत असल्याने माझी अर्थिक परिस्थीती खुपच हालाकीची झाली आहे त्यात आपण मला सेवेतून बडतर्फ केलेले आहे. तरी वरिल नमुद केलेल्या सर्व बाबीचा सहानभुतपुर्वक विचार करुन मला दिलेली शिक्षा रद्द होऊन माझी निर्दोष मुक्तता करणेत यावी ही कळकळीची नम्र विनंती

आहे. करोना आजारामुळे सुविधा उपलब्ध नसल्यामुळे आवश्यक लागनारे कादपत्र व पुरावे जोडले नाही ते नंतर जोडपत्रासोबत देण्याची तजविज ठेवली आहे. 2

**शिस्तभंग प्राधिकारी यांचे म्हणणे :-** दिलेली शिक्षा कसुरीच्या आधारे, योग्य असल्याने सदर शिक्षा कायम करण्यात यावी.

**निष्कर्ष:**

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी सादर केलेले अपिल हा अभिलेखाचा भाग आहे. सदर प्रकरणी अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेण्यांत आली. सदर प्रकरणी उपलब्ध कागदपत्रे तपासण्यात आली तसेच शिस्तभंग प्राधिकारी यांचे कार्यालयातील सुनावणीस हजर राहण्यासाठी प्राधिकृत केलेले संबंधित अधिकारी यांचे म्हणणे ऐकले.

अपिलार्थी हे पोलीस मुख्यालय, पुणे शहर येथे कार्यरत असताना येरवडा जेल येथील आरोपी काढणेबाबतचे मागणीपत्रात १ आरोपी काढणेबाबत उल्लेख केला असताना न्यायाधीन बंदीबाबत कर्तव्यावर नेमण्यात आले होते. अपिलार्थी यांनी दोन आरोपी काढून त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटीस यास न्यायालयाची कार्यवाही झाल्यानंतर लॉकअप मध्ये जमा न करता मा. न्यायालयाची परवानगी नसताना बेकायदेशीरपणे दि.०३.११.२०१८ रोजी दुपारी १४.०० वा नंतर परस्पर आरोपी दिपक पाटील याचा मुलगा सिद्धार्थ पाटील याचे खाजगी चार चाकी वाहनातुन आरोपी दिपक पाटील यास त्याचे घरी करिष्मा सोसायटी कोथरूड, पुणे येथे घेवून गेलेत तथापि अपिलार्थी यांची आत्तापर्यंतची सेवा पहाता व त्यांना मिळालेली बक्षीस हे पाहता त्यांना सेवेत येणेसाठी एक संधी देणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-1 नियम 449 मधील पोट नियम 3 नुसार कसुरदारास टप्प्याटप्प्याने शिक्षा देण्याचे शासनाचे धोरण आहे. अपिलार्थी यांना सेवेत येणेसाठी एक संधी देणेच्या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.

एकंदरीत प्रकरणाचे स्वरुप, उपलब्ध कागदपत्रे आणि अपिलार्थी यांनी त्यांच्या अपिल अर्जाद्वारे तसेच प्रत्यक्ष सुनावणी दरम्यान केलेल्या अभिवेदनाद्वारे मांडलेले मुद्दे इत्यादी विचारात घेऊन महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत कलम २७-ए नुसार प्रदान केलेल्या अधिकारानुसार आणि महाराष्ट्र पोलिस (शिक्षा व अपीले ) नियम,१९५६ मधील नियम ११ खाली प्राप्त झालेल्या अपील अर्जावर नियम १८ नुसार पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**निर्णय**

१ . अपिलार्थी सर्वश्री. नामदेव दादाभाऊ डगळे, पोलीस नाईक -850, व कमलेश बाळासाहेब पाटील, पोलीस शिपाई-4660 दोघेही नेम. पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे शहर यांचा अपिल अर्ज मान्य करण्यात येत आहे येत आहे.

२. अपिलार्थी सर्वश्री. नामदेव दादाभाऊ डगळे, पोलीस नाईक -850, व कमलेश बाळासाहेब पाटील, पोलीस शिपाई-4660 दोघेही नेम. पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे शहर **यांना** शिस्तभंग प्राधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त , प्रशासन, पुणे शहर यांचे जा.क्रआस्था-१०/विचौ/पोना-८५०,डगळे व पोशि./४६६०,पाटील/अं.आ १ ३७६ / २०२० दि.०६.०३.२०२० अन्वये "शासकीय सेवेतून बडतर्फ करणे" ही शिक्षा रद्द करुन त्याऐवजी "देय वार्षिक वेतनवाढी तीन वर्षे (परिणामकारक) रोखणे " ही शिक्षा देण्यात येत आहे.

३. वरीलप्रमाणे संबंधितांनी निर्णयाची अंमलबजावणी करुन शासनास त्वरीत अहवाल सादर करावा.

प्रमाणित प्रत

(सतेज पाटील)
राज्यमंत्री,गृह (शहरे)

दिनांक: 02/06/2022
**ठिकाण:-मुंबई**

कक्ष अधिकारी
गृह विभाग, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

29

महाराष्ट्र शासन
गृह विभाग, मुख्य इमारत,
दुसरा मजला,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२ २२०४८३२५. Email ID : deskpol6b.home.

---

क्र. पीडीई ०९२० / प्र.क्र. ३५५ / पोल — ६ ब, दिनांक : ०७.०६. २०२२

प्रति,
अपर पोलीस आयुक्त (प्रशासन),
पुणे शहर.

विषय : **शिक्षेविरुध्द अपीलावरील सुनावणीचे आदेश.**
संदर्भ : जा.क्र. आस्था — १० / विचौ / पोना — ८५०, डगळे व पोशि./४६६०, पाटील / अं. आ. / ३७६ / २०२०, दि. ०६.०३.२०२०

श्री. नामदेव दादाभाऊ डगळे, पोना./८५०, व श्री. कमलेश बाळासाहेब पाटील, पोशि./४६६०, नेम. पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांनी संदर्भिय आदेशाविरुध्द शासनाकडे दाखल केलेल्या अपील अर्जावर दिनांक २४.०२.२०२२ रोजी दुरदृश्य माध्यमाद्वारे (व्ही. सी. द्वारे) अपिलीय प्राधिकारी तथा मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचेसमोर सुनावणी संपन्न झाली. सदर सुनावणी अंती अपिलीय प्राधिकारी तथा मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांनी दिलेल्या निर्णयाची प्रमाणित प्रत सोबत संलग्न केली आहे.

श्री. नामदेव दादाभाऊ डगळे, पोना./८५०, व श्री. कमलेश बाळासाहेब पाटील, पोशि./४६६०, नेम. पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचे अपील अर्जासंदर्भात अपिलीय प्राधिकारी तथा मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांनी दिलेल्या निर्णयाचे अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल शासनास विनाविलंब सादर करावा, ही विनंती.

सोबत :- वरीलप्रमाणे.

(उदय बा. काण्मव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-
१) श्री. नामदेव दादाभाऊ डगळे, पोना./८५०, व श्री. कमलेश बाळासाहेब पाटील, पोशि./४६६०, नेम. पोलीस मुख्यालय, पुणे शहर (अपर पोलीस आयुक्त (प्रशासन), पुणे शहर यांच्या कार्यालयामार्फत )
२) मा. राज्यमंत्री[redacted] यांचे खाजगी सचिव.
३) निवडनस्ती पोल — ६ ब.

म.ना.से.(पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी आणि सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नुसार पोना/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे आणि पोशि/४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांचा सेवाबाह्य कालावधी नियमित करण्याबाबत.

3-

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
आदेश क्र.आरपीए ०९२२/प्र.क्र.५४९/पोल-६ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : २० जुलै,२०२३

संदर्भ :- १. क्र. आस्था-१०/विचौ/पोना-८५०डगळे व पोशि.४६६० पाटील/अ.आ./३७६/२०२०, दि.०६.०३.२०२०
२. शासन आदेश क्र.पीडीई ०९२०/प्र.क्र.३५५/पोल-६ब, दि.०२.०६.२०२२
३. क्र. आस्था-१०(विचौ)/अपील आदेश/पोना८५० डगळे व पोशि.४६६०पाटील/१११२/२०२२, दि.२८.०६.२०२२
४. शासन कारणे दाखवा नोटीस क्र. आरपीए ०९२२/प्र.क्र.५४९/पोल-६ब, दि.१३.०१.२०२३
५. पोना/डगळे व पोशि/पाटील यांचे दि. २३.०२.२०२३ रोजीचे अभिवेदन

**आदेश**

पोना/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई/४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांना त्यांनी केलेल्या कसूरीकरीता विभागीय चौकशी अहवालाआधारे शिस्तभंग प्राधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांनी त्यांच्या दि.०६.०३.२०२० रोजीच्या आदेशान्वये " शासकीय सेवेतून बडतर्फ (Dismissal from Service) "ही शिक्षा बजाविण्यांत आली होती. सदर आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी शासनास सादर केलेल्या अपिलावर दि.२४.०२.२०२२ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा तत्का. मा. राज्यमंत्री(गृह-शहरे) यांचेसमोर झालेल्या सुनावणी अंती अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांनी बजावलेली " शासकीय सेवेतून बडतर्फ (Dismissal from Service)" ही शिक्षा रद्द करुन त्याऐवजी "देय वार्षिक वेतनवाढी तीन वर्षे (परिणामकारक)रोखणे" ही शिक्षा बजावण्याचा निर्णय संदर्भ क्र.२ अन्वये घेतला.

२. अपिलीय प्राधिकारी तथा तत्का. मा. राज्यमंत्री(गृह-शहरे) यांच्या संदर्भिय क्र. २ येथील आदेशास अनुसरुन शिस्तभंग प्राधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांनी दि.२८.०६.२०२२ अन्वये अपिलार्थी यांना सेवेत पुन:स्थापित करण्यात आले असून अपिलार्थि पोना/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई/४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील दोघेही दि.२९.०६.२०२२ रोजी कर्तव्यावर हजर झाले आहेत. त्यानुसार परिगणणेअंती अपिलार्थी यांचा निलंबन कालावधी दि.०५.११.२०१८ ते दि.०५.०३.२०२० व सेवाबाहय कालावधी दि.०६.०३.२०२० ते दि.२८.०६.२०२२ असा आहे.

३. शिस्तभंग प्राधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त, प्रशासन पुणे शहर यांनी बजाविलेली "शासकीय सेवेतून बडतर्फ" ही शिक्षा रद्द करुन त्याऐवजी "देय वार्षिक वेतनवाढी तीन वर्षे (परिणामकारक) रोखणे ही शिक्षा देण्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा तत्का.मा. राज्यमंत्री(गृह-शहरे) यांनी घेतला आहे. सदर बाब विचारात घेता अपिलार्थी यांना अपिलीय प्राधिकारी यांनी पूर्णपणे दोषमुक्त केलेले नाही. सबब, अपिलार्थी यांचा निलंबन कालावधीसह सेवाबाहय कालावधी नियमित करण्यासंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम,१९८१ मधील नियम ६८ व ७०(१)(ए)(बी)आणि ७०(४)(५) मधील तरतुदी आकर्षित होतात. त्यानुसार दि.०५.११.२०१८ ते दि.०५.०३.२०२० पर्यंतचा निलंबन कालावधी व दि.०६.०३.२०२० ते दि.२८.०६.२०२२ पर्यंतचा सेवाबाहय

कालावधी नियमित करण्यासंदर्भात दि. १३.०१.२०२३ अन्वये अपिलार्थी यांना रितसर कारणे दाखवा नोटीस बजाविण्यांत आली आहे. सदर कारणे दाखवा नोटीस संदर्भात अपिलार्थी यांचे अभिवेदन विहित कालमर्यादेत (कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाल्यापासून ६० दिवस) शासनास प्राप्त झाले आहे. अपिलार्थी यांनी दिलेल्या निवेदनामध्ये कारणे दाखवा नोटीसमधील प्रस्तावित कार्यवाहीस असहमती दर्शविली असून निलंबन व सेवाबाहय कालावधी हा सेवाकाळ धरुन नियमाप्रमाणे १००% वेतन व भत्ते देण्याची विनंती केली आहे.

४. शिस्तभंग प्राधिका-यांनी दिलेल्या शिक्षेच्या विरुध्द केलेल्या अपिलात अपिलीय प्राधिकारी यांनी पोना/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई/४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांना पूर्णत: निर्दोष ठरविण्यात आलेले नाही, ही बाब विचारात घेता, महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम,१९८१ मधील नियम ६८ व ७०(१)(ए)(बी)आणि ७०(४)(५) मधील तरतूदीच्या अनुषंगाने अपिलार्थि पोना/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई/४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांचा निलंबन कालावधीसह सेवाबाहय कालावधी खालीलप्रमाणे नियमित करण्यात येत आहे.

अ) दि.०५.११.२०१८ ते दि.०५.०३.२०२० या निलंबन कालावधीकरीता अपिलार्थी यांना महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने)नियम ६८ नुसार देय असलेले वेतन व भत्ते देण्यात यावे परंतु उक्त निलंबन कालावधी हा सेवानिवृत्ती प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ कामावर व्यतित केलेला कालावधी न मानता निलंबन कालावधी म्हणून गणण्यांत यावा.

ब) दि.०६.०३.२०२० ते दि.२८.०६.२०२२ या सेवाबाहय कालावधीकरीता अपिलार्थी यांना सेवेतून बडतर्फ केले नसते तर जेवढे वेतन व भत्ते मिळण्यास हकदार झाले असते त्याच्या ५० टक्के वेतन व भत्ते देण्यांत यावे परंतु उक्त सेवाबाहय कालावधी हा सेवानिवृत्ती प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ कामावर व्यतित केलेला कालावधी न मानता सेवाबाहय कालावधी म्हणून गणण्यात यावा.

हे आदेश (१) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी...इ.) नियम, १९८१ मधील नियम ७०(१) अनुसार सक्षम प्राधिका-यांना असलेल्या अधिकारात व (२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.निलंब१०८७/सीआर१०६/सेवा-२, दिनांक २४.१२.१९८७ मधील तरतुदी विचारात घेऊन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(अजित तायडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत

१. अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर
त्यांना विनंती करण्यांत येते की, सदर आदेशाची मूळ प्रत अपिलार्थी पोना/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई/४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांना देण्यांत यावी व ती प्राप्त झाल्याच्या संदर्भात जादा प्रतीवर त्यांची नांवाप्रहीत स्वाक्षरी घेऊन जादा प्रत शासनास सादर करावी व सहपत्रांची पोच द्यावी.

२. पोना/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई/४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील (अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांचे कार्यालयामार्फत)

३. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई

४. महालेखापाल(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई

५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ६.निवडनस्ती, कार्यासन पोल-६ब

32

महाराष्ट्र पोलीस

**पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे शहर**
**२, साधु वासवानी रोड, कॅम्प, पुणे ४११ ००१**
**आस्थापना-१०(वि.चौ.)**

जा.क्र.आस्था-१०(विचौ)/पोना.८५०.डगळे व पोशि.४६६०.पाटील/निलंबन व सेवाबाहय कालावधी/२०२३/1526
पुणे शहर, दि, /8 / 08 /२०२३ / 8500

संदर्भ- १)जा.क्र.आस्था-१०/विचौ//पोना.डगळे व पोशि.ाटील/अं.आ./३७६/२०२०,दि.०६/०३/२०२०.
२)शासन आदेश क्र.पीडीई.०९२०/प्र.क्र३५५/पोल-६ ब,दि.०७/०६/२०२२
३)जा.क्र.आस्था-१०(विचौ)/अपिल आदेश/पोना.डगळे व पोशि.पाटील/१११२/२०२२ दि.२८/०६/२०२२.
४)शासन कारणे दाखवा नोटीस क्र.आरपीए ०९२२/प्र.क्र.५४९/पोल-६ब,दि.१३/०१/२०२३.
५)पोना/डगळे व पोशि/पाटील यांचे दि.२३/०२/२०२३ रोजीचे अभिवेदन.
६)आदेश क्र.पीडीई.०९२०/प्र.क्र५४९/पोल-६ ब,दि.२०/०७/२०२३.

विषय-<u>**निलंबन व सेवाबाहय कालावधीबाबत.**</u>
१)पोना.क्र.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व
२)पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील
दोघेही नेमणूक-पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे शहर

—ooo—

<u>०२/-</u> उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये पोना.क्र.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोशि. ४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील, दोघेही नेमणूक-पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे शहर यांचेविरुध्द् विभागीय चौकशीअंती त्यांना त्यांचे कसूरीबाबत **"शासकीय सेवेतून बडतर्फ करणे"** ही शिक्षा देण्यात आली होती.

<u>०३/-</u> पोना.क्र.८५०/डगळे व पोशि.४६६०/पाटील यांनी वरील शिक्षेविरुध्द् अपिल केले असता,संदर्भ क्र.१ अन्वये देण्यात आलेली "शासकीय सेवेतून बडतर्फ" ही शिक्षा रदद् करुन त्याऐवजी **" देय वार्षिक वेतनवाढी ०३ वर्षे (परिणामकारक) रोखणे "** ही शिक्षा संदर्भ क्र.२ अन्वये देण्यात आली आहे.

<u>०४/-</u> शासन आदेशानुसार पोना.८५०/डगळे व पोशि.४६६०/पाटील यांना संदर्भ क्र.३ अन्वये शासकीय सेवेत पुनःस्थापित करण्यात आले असून,सदरचे आदेश त्यांनी दि.२८/०६/२०२२ रोजी स्वीकारलेनंतर ते दि.२९/०६/२०२२ रोजी कर्तव्यावर हजर झाले आहेत.

<u>०५/-</u> पोना.क्र.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांचा दि.०५/११/२०१८ ते दि.०५/०३/२०२० पर्यंत निलंबन कालावधी आणि दि.०६/०३/२०२० ते दि.२८/०६/२०२२ पर्यंत त्यांचा (बडतर्फ) सेवाबाहय कालावधी नियमित करण्यासंदर्भात त्यांना संदर्भ क्र.४ अन्वये शासनाकडून कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असता, कारणे दाखवा नोटीससंदर्भात नमूद पोलीस अंमलदार यांनी संदर्भ क्र.५ अन्वये निलंबन व सेवाबाहय कालावधी हा सेवाकाळ धरुन नियमाप्रमाणे १००% वेतन व भत्ते देण्याची विनंती केली होती.

<u>०६/-</u> अपिलार्थी पोना.क्र.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांचा निलंबन कालावधी आणि सेवाबाहय कालावधी हा संदर्भ क्र.६ अन्वये पुढीलप्रमाणे नियमित करण्यात आलेला आहे.

३३

(अ) दि.०५/११/२०१८ ते दि.०५/०३/२०२० या निलंबन कालावधीकरिता अपिलार्थी यांना महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम ६८ नुसार देय असलेले वेतन व भत्ते देण्यात यावे परंतु उक्त निलंबन कालावधी हा सेवानिवृत्ती प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ कामावर व्यतित केलेला कालावधी न मानता निलंबन कालावधी म्हणून गणण्यात यावा.

(ब) दि.०६/०३/२०२० ते दि.२८/०६/२०२२ या सेवाबाहय कालावधीकरिता अपिलार्थी यांना सेवेतून बडतर्फ केले नसते तर जेवढे वेतन व भत्ते मिळण्यास हकदार झाले असते त्याच्या ५० टक्के वेतन व भत्ते देण्यात यावे परंतु उक्त सेवाबाहय कालावधी हा सेवानिवृत्ती प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ कामावर व्यतित केलेला कालावधी न मानता सेवाबाहय कालावधी म्हणून गणण्यात यावा.

०७/- तरी वरील संदर्भ क्र.६ अन्वये निर्गमित शासन आदेशामधील निलंबन कालावधी व सेवाबाहय कालावधीची नोंद पोना.क्र.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोशि. ४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील, दोघे नेमणुक-पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचे मूळ सेवापुस्तकामध्ये घेवून, संबंधितांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

( अरविंद चौंवरिया )
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,
पुणे शहर.

प्रति,

पोना.क्र.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे आणि पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील,नेम-मुख्यालय.

**प्रत मार्फतीने :-**

राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे शहर.

२/- सदर आदेशाची मूळ प्रत पोना.क्र.८५०/नामदेव डगळे व पोशि.४६६०/कमलेश पाटील यांना अदा करून, दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून ती दुय्यम प्रत उलटटपाली या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-**

प्रमुख लिपीक,आस्थापना-०३ / लेखा शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर.

प्रमुख लिपीक,वेतन देयक शाखा/आस्थापना-१०(२ व ४ ),मुख्यालय,पुणे शहर-योग्य कार्यवाहीकरिता.

पोलीस नोटीस शाखा-प्रसिध्दीपत्रकासाठी.

**प्रत सविनय सादर:-**

मा.अपर मुख्य सचिव,गृह विभाग,मंत्रालय,मुंबई. (सोबत- संदर्भ क्र.६ मधील आदेशाच्या मूळ प्रती अपीलार्थी यांना देवून, छायांकित प्रतीवर त्यांच्या दिनांकित स्वाक्षरी घेण्यात आलेल्या असून,ती छायांकित प्रत जोडली आहे.)

ANN -XV-E- A2

34

महाराष्ट्र पोलीस

जा.क्र.पोउपआ मुख्या-४/आस्था-१०(४)/निलंबन/२०१८ / ७२६६,
पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय,
२, साधु वासवानी रोड, कॅम्प, पुणे ४११००१.
दिनांक - ५ /११/२०१८.

संदर्भ : वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोर्ट कंपनी, मुख्यालय,पुणे शहर कडील जा.क्र. ३९२७/२०१८, दि.५.११.२०१८

विषय : निलंबनाबाबत...
१) पोना/८५०,नामदेव दादाभाउ डगळे २) पोशि ४६६०/कमलेश बाळासाहेब पाटिल (दगाबाज), दोघेही नेम. कोर्ट कंपनी, पोलीस मुख्यालय, पुणे शहर.

---ooo---

आ दे श :

२. ज्याअर्थी तुम्ही १) पोना/८५०,नामदेव दादाभाऊ डगळे २)पोशि/४६६०,कमलेश बाळासाहेब पाटिल (दगाबाज), दोघेही नेम. कोर्ट कंपनी, पोलीस मुख्यालय, पुणे शहर तुमची/अनु क्र.१) दि.३.११.२०१८ रोजी कोर्ट क्र.९ चा आरोपी दिपक यशवंत पाटील, (चतुश्रृंगी पोलीस ठाणे गु.र.नं.१७५/२०१८ भादवि ४२०,४०६,४०९,४६७,४६८,४७१,४७४) मधील नमुद आरोपीस प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.कोर्ट न. ९ पुणे कोर्ट केस तारिख कामी याची कोर्ट पेशी कामी व अनु क्र.२ यांची माडीगेट, येरवडा जेल येथे कर्तव्याकरीता नेमणूक केलेली होती.

३. आणि ज्याअर्थी तुमची अति मजबुत पथकात नेमणूक करण्यात येवुन तुम्हास खालीलप्रमाणे लेखी आदेश देण्यात आले होते.

मा.येरवडा जेल येथून दररोजचे कोर्टपेशी, ससून दवा, बाहेरगाव पार्टी यासाठी पोलीस पथकाचे मागणीपत्र हे इकडील कार्यालयास पाठविले जाते. त्या मागणीपत्रानुसार कोर्ट कंपनीस असणा-या मनुष्यबळातून प्राधान्याने न चुकता असणा-या न्यायबंदी यांना कोर्टपेशी, ससून दवा यासाठी काढले जाते. तसेच मा.येरवडा जेल यांचे मागणीपत्रात न्यायबंदी यांचे नावाचा उल्लेख केलेला नसलेने कोणता आरोपी कोर्ट पेशी, ससून दवा कामी निघणार आहे याबाबत निश्चितता नसते. तसेच मागणीपत्रात उल्लेख नसलेला एखादा आरोपी अचानक कोर्ट पेशी, ससून दवाकामी मा.येरवडा जेल यांचेकडून ताब्यात देणेत आला तर तशी कोर्ट कंपनी ठाणे दैनंदिनी येथे नोंद घेणेत येते. सदर बंदी कोर्टपेशी, ससून दवा, बाहेरगाव पार्टी कामी काढणेत येणा-या बंदयांना मोबाईल फोनवर बोलु देऊ नये , बाहेरील खाद्य पदार्थ खाण्यास व मादक द्रव्य, अंमली पदार्थ सेवन करण्यास देऊ नयेत तसेच कोर्ट पेशी, ससून दवा झालेनतर न्यायबंदी यांस तात्काळ येरवडा जेल येथे जमा करणेबाबत वारंवार तोंडी व लेखी आदेश दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी तुम्ही दि.०३/११/२०१८ रोजीचे मागणीपत्रात मा.कोर्ट क्र.९ (मे.जाधव कोर्ट),- १ आरोपी न चुकता असा उल्लेख करणेत आला होता. त्यानुसार १ आरोपीसाठी २ कर्मचारी याप्रमाणे पोना/८५० डगळे व पोशि/१०७०४ विखे(रायफल) यांना सदरचे कर्तव्य देणेत आले होते. त्याप्रमाणे पोना/८५० डगळे व पोशि/१०७०४ विखे(रायफल) हे आरोपी काढणेसाठी येरवडा जेल येथे रवाना झाले, परंतू येरवडा जेल येथे गेलेनंतर त्यांनी मागणीपत्रात १ आरोपीचा उल्लेख असताना व त्यांनाही १ न्यायबंदीबाबत कर्तव्य नेमले असताना, त्यांनी २ आरोपी ताब्यात घेतले, व सदरचे मागणीपत्रात उल्लेख नसलेला आरोपी विशाल दत्तात्रय शिंदे यांस ताब्यात घेतले व सदरबाबत त्यांनी आणखी १ आरोपी काढणेसाठी वाढीव मनुष्यबळ लागणार असलेबाबत काहीही कळविले नाही. व याची कोर्ट कंपनी ठाणे दैनंदिनी येथे कोणतीही नोंद करणेत आलेली नाही, तसेच सदरच्या आरोपीबाबत पोना/८५० डगळे व पोशि/१०७०४ विखे(रायफल) यांनी कोणासही कल्पना दिली नाही. येरवडा जेल येथे माडीगेट येथे कर्तव्यास असणारे पोशि/४६६०के बी पाटील, नेमणूक – कोर्ट कंपनी, शिवाजीनगर, पुणे. हे सुध्दा त्यांना माडीगेट, येरवडा जेल येथे कर्तव्य असताना, पोना/८५० डगळे व पोशि/१०७०४ विखे(रायफल) यांचेसह सदरचे २ आरोपी दिपक यशवंत पाटील व विशाल शिंदे यास घेवून शिवाजीनगर कोर्ट येथे आले. शिवाजीनगर कोर्ट येथे १२.४५वा. सदरचे २ आरोपींची कोर्ट पेशी झालेनंतर पोना/८५० डगळे व पोशि/४६६० पाटील यांनी पोशि/१०७०४ विखे(रायफल) यांस आरोपी विशाल शिंदे यांस कोर्ट लॉकअप येथे जमा करून वॉरंट नोंद करणेकामी कोर्ट लॉकअप डायरी येथे पाठविले.

३५

त्यानंतर पोना/८५० डगळे व पोशि/४६६० पाटील(दगाबाज) हे आरोपी दिपक यशवंत पाटील यांस खाजगी वाहनाने फ्लॅट नं.९०४, बिल्डींग नं.ए/११, करिष्मा हाऊसिंग सोसायटी, कोथरूड, पुणे येथे घेवून गेले. नियंत्रण कक्ष, पुणे शहर येथे सदरबाबत माहिती मिळालेने नियंत्रण कक्ष, पुणे शहर यांनी अलंकार पोलीस ठाणेस सदर प्रकाराची माहिती दिलेने अलंकार मार्शल-१ वरील कर्मचारी यांनी कॉलची खात्री केली असता, आरोपी दिपक यशवंत पाटील हा पोना/८५० डगळे व पोशि/४६६० पाटील(दगाबाज) यांचेसह फ्लॅट नं.९०४, बिल्डींग नं.ए/११, करिष्मा हाऊसिंग सोसायटी, कोथरूड, पुणे येथील पत्त्यावर मिळून आलेने मार्शलवरील कर्मचारी यांनी त्यांस अलंकार पोलीस ठाणे येथे घेवून गेले. व त्यानंतर पोना/८५० डगळे यांनी डी.ओ.पोहवा/३०९२ कृष्णा शेवाळे यांना फोनव्दारे सदरचा प्रकार सांगितला.

आणि ज्याअर्थी तुम्ही तुम्हास देण्यात आलेल्या सूचना व आदेशाकडे दुर्ल क्ष करुन तुम्ही कायदेशीर कर्तव्यामध्ये कसूर करुन तसेच वरिष्ठांचे आदेशाचा अवमान करुन पोलीस दलाचे शिस्तीस बाधा आणणारे निष्काळजी व बेजबाबदारपणाचे वर्तन दिसून येत आहे.

४. त्याअर्थी तुम्ही १) पोना/८५०,नामदेव दादाभाउ डगळे २) )पोशि/४६६०,कमलेश बाळासाहेब पाटिल (दगाबाज) दोघेही नेम. पोलीस मुख्यालय, पुणे शहर तुम्हास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम २५ व २६ आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ च्या तरतुदीनुसार तुमच्या उपरोक्त कसुरीच्या अनुषंगाने प्राथमिक/विभागीय चौकशीच्या अधीन राहून सदर आदेश निर्गमित झाले तारखेपासून शासकीय सेवेतून निलंबित करण्यात येत आहे.

५. तुम्हास महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६८ अन्वये अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्ता व त्यावरील भत्ते देय राहतील. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६९ (४) मधील तरतुदीनुसार तुम्ही प्रत्येक महिन्यास निर्वाह भत्ता घेण्यापूर्वी तुम्ही निलंबन कालावधीत कोणत्याही प्रकारची खाजगी नोकरी किंवा धंदा स्विकारुन अर्थाजन केले नाही याबाबतचे प्रमाणपत्र देऊन निर्वाह भत्त्याची रक्कम स्विकारावी. तुम्ही निलंबन कालावधीमध्ये खाजगी नोकरी किंवा धंदा स्वीकारला तर तुमच्या निलंबन कालावधीमध्ये तुम्हास देय असलेला निर्वाह भत्त्यावरील हक्क गमवाल.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम १९७९ मधील नियम ६७ अन्वये निलंबन कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची रजा देय नाही. कोणत्याही वेळी मुख्यालय सोडण्यापूर्वी तुम्ही पोलीस उप आयुक्त, मुख्यालय-२, पुणे शहर यांची तशी आगाऊ परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १५ च्या तरतुदी नुसार आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. पोमसं/१४ अ/६७/एम.एम-०४/२०११ दि.४/४/२०१३ अन्वये तुम्ही निलंबन कालावधीमध्ये दररोज राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पुणे शहर येथे हजेरी द्यावी.

(स्वप्ना एच. गोरे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
पुणे शहर

प्रति,
१) **पोना/८५०,नामदेव दादाभाऊ डगळे व २) )पोशि/४६६०,कमलेश बाळासाहेब पाटिल (दगाबाज) दोघेही नेम. पोलीस मुख्यालय, पुणे शहर.**
मार्फत व प्रत : राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पुणे शहर.
२/- सदर आदेशाची मूळ प्रत संबंधितास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन ती प्रत उलट टपाली या कार्यालयास सादर करावी.
प्रत : वरिष्ठ श्रेणी लिपीक, वेतन देयक लिपीक, पोलीस मुख्यालय, पुणे शहर.
२/- संबंधित कर्मचारी यांना दरमहा निर्वाह भत्ता रक्कम अदा करताना त्यांचेकडुन परिच्छेद क्र.५ प्रमाणे प्रमाणपत्र घ्यावे.

प्रत : प्रमुख लिपीक, आस्थापना-३/इमारत लिपीक/पोलीस नोटीस, पुणे शहर
**प्रत सविनय सादर,**
१. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर.
३. मा. अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर

रापोनि कार्यालय पुणे शहर
आवक क्रमांक - 8522/१८
दाखल दिनांक - ५/१२/१८
शाखा/कार्यालय - PNJ

ANNEXURE - A3 3

1943

जा.क्र/ पो.उपआयुक्त, मुख्या-२/आस्था.१०/विचौ/ पोना.८५०,पोशि.४६६०/ /२०१९ पुणे शहर, दि. ९/०१/१९

विषय :- विभागीय चौकशी.
१) पोना/८५० नामदेव दादाभाऊ डगळे, नेम :- पोलीस मुख्यालय
२) पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील, नेम. पोलीस मुख्यालय

-: आदेशः-

कर्तव्यात बेशिस्त, बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनीय असे वर्तन की, ज्यात पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील , नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर येथे कर्तव्यार्थ असताना, त्यांनी केलेल्या कसुरी प्रकरणी त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याइतपत पुरावा असल्याची 'सक्षम प्राधिकारी' म्हणून खात्री झाली आहे.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २५ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, स्वप्ना एच. गोरे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, पुणे शहर 'सक्षम प्राधिकारी' म्हणून पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील , नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्याचे आदेश देत आहे.

३. सदर विभागीय चौकशी चालविण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून सहायक पोलीस आयुक्त, अभियान, पुणे शहर यांची नेमणूक करण्यात येत आहे. चौकशी अधिकारी यांनी सदरहू विभागीय चौकशीचे कामकाज अंमलात असलेल्या विभागीय चौकशी संबंधातील नियमांचे काटेकोरपणे पालन करुन शिघ्रतेने विहीत मुदतीत पुर्ण करावे.

४. सहायक पोलीस आयुक्त, अभियान, पुणे शहर तथा विभागीय चौकशी अधिकारी यांनी चौकशी पुर्ण होताच चौकशीचे अभिलेख (खंड १ ते ९) दाखल करुन समारोप अहवालाच्या ३ प्रतींसह या कार्यालयात सादर करावीत.

५. सहायक पोलीस आयुक्त, अभियान, पुणे शहर तथा विभागीय चौकशी अधिकारी यांनी सदरचे आदेश अपचारी पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांना लेखी स्वरुपात कळवावेत.

६. प्रस्तुत आदेशासोबत जोडपत्र-१ दोषारोप, जोडपत्र-२ अभिकथनपत्र, जोडपत्र-३ सरकारी साक्षीदारांची यादी, जोडपत्र-४ सरकारी दस्तऐवज यादी चौकशीच्या कागदपत्रांसह पाठविण्यात येत आहे. सदर कागदपत्रे प्राप्त झालेबाबत कृपया पोच दयावी. प्रस्तुत कागदपत्रापैकी जोडपत्र १ ते ४ (दोषारोपपत्र, अभिकथनपत्र, सरकारी साक्षीदारांची यादी, सरकारी दस्तऐवजांची यादी) तसेच हा आदेश यांच्या छायांकित प्रती अपचारी पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील नेम. पोलीस मुख्यालय, यांना तात्काळ बजावून त्या प्रती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांचेकडून दिनांकित स्वाक्षरीची पोच घ्यावी व ती पुरावा म्हणून चौकशीच्या अभिलेखात समाविष्ठ करावी.

७. सहायक पोलीस आयुक्त, अभियान, पुणे शहर तथा विभागीय चौकशी अधिकारी यांनी विभागीय चौकशीचा रोजनामा वेळोवेळी नियमीतपणे न चुकता सादर करावा. तसेच सदर विभागीय चौकशी महाराष्ट्र शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीडीआर-११७४/२९८३/(१)/डी/रोमन-१, दि. ०८.०४.१९७४ प्रमाणे नियमांचे काटेकोरपणे पालन करुन ६० दिवसांचे आत पुर्ण करावी. विभागीय चौकशी मुदतीत पुर्ण न झाल्यास वेळोवेळी मुदतवाढ प्रस्ताव या कार्यालयास पाठवावा.

( प्रकाश गायकवाड )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय-२
पुणे शहर.

प्रति,
सहायक पोलीस आयुक्त, अभियान, पुणे शहर तथा विभागीय चौकशी अधिकारी .

प्रत,
पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील ,दोघेही नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर.
(मार्फतः- सहायक पोलीस आयुक्त, अभियान, पुणे शहर तथा विभागीय चौकशी अधिकारी)

प्रत माहितीस :- प्रमुख लिपीक, विभागीय चौकशी शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

जोडपत्र-१

पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील , नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचे विरुद्धचे विभागीय चौकशीतील दोषारोपपत्र.

दोषारोप :-

कर्तव्यात बेशिस्त, बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनीय असे वर्तन की ज्यात पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचे विरुद्ध खालीलप्रमाणे दोषारोप ठेवण्यात येत आहेत.

दोषारोप :- पो.ना./८५० नामदेव डगळे,पो.शि.४६६० कमलेश बाळासो पाटील दोन्ही नेमणुक पोलीस मुख्यालय हे येरवडा जेल येथील आरोपी काढणेबाबतचे मागणीपत्रात १ आरोपी काढणेबाबत उल्लेख केलेला असताना व त्यांनाही न्यायाबंदीबाबत कर्तव्य नेमले असताना नमुद पोलीस कर्मचारी यांनी दोन आरोपी काढुन त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यांस बेकायदेशीर पणे त्याचे राहते घरी घेऊन गेले बाबत कसुरी केली आहे.

अशा प्रकारे पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांनी शासकीय सेवेत सचोटी, कर्तव्यपरायणता राखणे आवश्यक असताना शासकीय सेवकास अत्यंत अशोभनीय असे वर्तन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम क्र.३ चे जाणीवपूर्वक उल्लंघन केले आहे.

अशा पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांनी जबाबदार पदी कर्तव्यास कार्यरत असताना शिस्तपालनाची अंमलबजावणी करण्यात गंभीर स्वरुपाची कसूर केली आणि शिस्तबद्ध पोलीस दलाची प्रतीमा मलीन करणारे आणि पोलीस दलाच्या हितसंबंधास अपाय करणारी बेशिस्त, बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनीय असे गंभीर स्वरुपाचे वर्तन केल्याने तुम्ही मुंबई पोलीस अधिनियम (शिक्षा व अपिले) नियम १९५६ च्या नियम ३ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २५ मध्ये नमुद केलेल्या शिक्षेस पात्र आहात.

( प्रकाश गायकवाड )
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय-२,
पुणे शहर

<u>जोडपत्र-२</u>

पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचे विरुध्दचे विभागीय चौकशीतील दोषारोप अभिकथन.

<u>दोषारोप अभिकथन</u> :-

पो.ना./८५० नामदेव डगळे,पो.शि.४६६० कमलेश बाळासो पाटील दोन्ही नेमणुक पोलीस मुख्यालय हे येरवडा जेल येथिल आरोपी काढणेबाबतचे मागणीपत्रात १ आरोपी काढणेबाबत उल्लेख केला असताना व त्यांनाही न्यायाबंदीबाबत कर्तव्य नेमले असताना नमुद पोलीस कर्मचारी यांनी दोन आरोपी काढुन त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यांस बेकायदेशीर पणे त्याचे राहते घरी घेऊन गेले बावत कसुरी केली आहे.

अशा प्रकारे पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांनी जबाबदार पदी कर्तव्यास कार्यरत असताना शिस्तपालनाची अंमलबजावणी करण्यात गंभीर स्वरुपाची कसूर केली आणि शिस्तबध्द पोलीस दलाची प्रतिमा मलीन करणारे आणि पोलीस दलाच्या हितसंबधास अपाय करणारी बेशिस्त, बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनीय असे गंभीर स्वरुपाचे वर्तन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम क्र.३ चे जाणीवपूर्वक उल्लंघन केले आहे.

तसेच तुमच्यावर ठेवलेले वरील दोषारोप चौकशीत सिध्द झाल्यास तुम्ही मुंबई पोलीस अधिनियम (शिक्षा व अपिले) नियम १९५६ च्या नियम ३ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २५ मध्ये नमुद केलेल्या शिक्षेस पात्र आहात.

( प्रकाश गायकवाड )
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय-२,
पुणे शहर

जोडपत्र-३

पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचे विरुद्धचे विभागीय चौकशीतील सरकारी साक्षीदारांची यादी.

सरकारी साक्षीदारांची यादी :-

सरकारी साक्षीदारांचे नाव.

१. श्री पंकज गुणवंतराव शिनगारे पोलीस उप-निरीक्षक, नेमणुक- अलंकार पोलीस स्टेशन पुणे शहर
२. श्री सुनिल दशरथ मोरे पो.हवा. ब.न. ५५२३ नेमणुक अलंकार पो.स्टे.पुणे शहर
३. श्री सागर शिवाजी रानगे पो.शि.ब.न. ८६९६ नेमणुक अलंकार पो.स्टे. पुणे शहर
४. श्री अजिनाथ दिनकर खेडकर पो.शि. ब.न. १०१४९ नेमणुक अलंकार पो.स्टे. पुणे शहर
५. श्री दत्तात्रय भिवशेन विखे पो.शि. ब.न. १०७०४ नेमणुक पोलीस मुख्यालय पुणे शहर
६. श्री कृष्णा वसंत शेवाळे पो.हवा. ब.न. ३०९२ नेमणुक पोलीस मुख्यालय पुणे शहर
७. श्री नामदेव दादाभाऊ डगळे पो.ना. ब.न. ८५० नेमणुक पोलीस मुख्यालय पुणे शहर
८. श्री कमलेश बाळासो पाटील पो.शि. ब.न. ४६६० नेमणुक पोलीस मुख्यालय पुणे शहर

प्राथमिक चौकशी अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी मध्ये साक्षीदार तपासुले आहेत. परंतु चौकशी अधिकारी यांना आवश्यकता वाटल्यास ते सदर विभागीय चौकशीमधे अधिक साक्षीदार तपासू शकतात.

( प्रकाश गायकवाड )
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय-२,
पुणे शहर

<u>जोडपत्र-४</u>

पोना/८५० नामदेव डगळे, पोशि/४६६० कमलेश बाळासो पाटील, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचे विरुद्धचे विभागीय चौकशीतील सरकारी दस्तऐवजांची यादी.

<u>सरकारी दस्तऐवजांची यादी</u> :-

१. हजेरीपट निल

२. दैनंदिनी निल

३. रिपोर्ट पो.नि. कोर्ट कंपनी मुख्यालय यांचे पत्र क्र. ३९२७/२०१८, दि. ५.११.२०१८ सादर केलेला अहवाल व त्याबावतची कागदपत्रे ०९

प्राथमिक चौकशी अधिकारी यांच्या प्राथमिक चौकशी अहवालामध्ये हजेरीपट व दैनंदिनी उपलब्ध नसल्याने सदर जोडपत्रामध्ये त्याचा उल्लेख केलेला नाही. चौकशी अधिकारी यांना आवश्यकता वाटल्यास ते सदर विभागीय चौकशीमधे अधिक दस्तऐवज तपासू शकतात.

( प्रकाश गायकवाड )
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय-२,
पुणे शहर

-NNEXURE- A4

41

जा.क्र.आस्था-१०(१)/विचौ/कादानो/पोना-८५०,डगळेवपोशि.४६६०,पाटील/१४०/२०२०
पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,
पुणे शहर,यांचे कार्यालय,
शिवाजीनगर, पुणे-४११००५.
दिनांक - १२/०१/२०२०

संदर्भ-१.जा.क्र.आस्था-१०/विचौ/पोना.८५०-पोशि.४६६०/७५९/२०१९,दि.०९/०७/२०१९.
२)विभागीय चौकशी अहवाल जा.क्र/सपोआ/अभियान/विचौ/१३/२०२०,दि.०८/०१/२०२०.
विषय-पोना.८५०/डगळे व पोशि.४६६०/पाटील, दोघे नेम-पोलीस मुख्यालय,पुणे शहर सध्या-(निलंबित) यांचे विभागीय चौकशीच्या अंतिम अहवालाबाबत

**प्रस्तावना :-**

संदर्भाधिन आदेश क्र.१ अन्वये पोलीस नाईक.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे, व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,नेम-पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचेविरुध्द विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली होती.सदर विभागीय चौकशीकामी सहाय्यक पोलीस आयुक्त,अभियान,पुणे शहर यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्याअनुषंगे त्यांनी संदर्भ क्र.२ अन्वये नस्ती क्र.१ ते ९ मध्ये चौकशीची कागदपत्रे आणि समाकलन अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

**दोषारोप :-**

तुम्ही, पोलीस नाईक.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे, व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,नेम-पोलीस मुख्यालय, पुणे शहर येथे दिनांक ०३/११/२०१८ रोजी न्यायाधिन बंदीच्या कर्तव्यावर असताना खालीलप्रमाणे कसूरी केली आहे.

**पोलीस नाईक.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे, व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,यांचे विरुध्दचे दोषारोप पत्र-**

तुम्ही, पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोन्ही नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर हे येरवडा जेल येथील आरोपी काढणेबाबतचे मागणीपत्रात १ आरोपी काढणेबाबत उल्लेख केला असताना व त्यांना न्यायाधिन बंदीबाबत कर्तव्य नेमले असताना नमुद पोलीस कर्मचारी यांनी दोन आरोपी काढुन त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यास न्यायालयाची कार्यवाही झाल्यानंतर लॉकअपमध्ये जमा न करता मा.न्यायालयाची परवानगी नसताना, बेकायदेशीरपणे दि.०३/११/२०१८ रोजी दुपारी १४:०० वा.नंतर, परस्पर आरोपी दिपक पाटील याचा मुलगा सिध्दार्थ पाटील याचे खाजगी चार चाकी वाहनातुन आरोपी दिपक पाटील यास त्याचे घरी करिष्मा सोसायटी कोथरुड, पुणे येथे घेवुन गेल्याची कसुर केली आहे. अशा प्रकारे पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील, दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांनी शासकीय सेवेत सचोटी व कर्तव्यपरायणता राखणे आवश्यक असताना, शासकीय सेवकास अत्यंत अशोभनीय वर्तन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम क्र.३ चे जाणीवपुर्वक उल्लंघन केले आहे.

पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांनी जबाबदार पदी कर्तव्यास असताना शिस्तपालनाची अंमलबजावणी करण्यात गंभीर स्वरुपाची कसुर केली आणि शिस्तबध्द पोलीस दलाची प्रतिमा मलीन करणारे आणि पोलीस दलाच्या हितसंबंधास अपाय करणारी बेशिस्त, बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनिय असे गंभीर स्वरुपाचे वर्तन केले आहे. तुमचे सदरचे वर्तन संशयास्पद व पोलीस खात्याच्या शिस्तीला बाधा आणणारे असुन, तुमच्या वर्तनाने पोलीस खात्याची जनमाणसात असलेली प्रतीमा मलिन झाली आहे.तुमच्यावर ठेवलेले वरील दोषारोप चौकशीमध्ये सिध्द झाले असल्याने, तुम्ही मुंबई पोलीस अधिनियम (शिक्षा व अपिले) नियम १९५६ च्या नियम ३ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २५ मध्ये नमुद केलेल्या शिक्षेस पात्र आहेत.

## चौकशीची कार्यवाही :-

१.अपचारी यांचा प्रथम जबाब नोंदविण्यात आला असून त्यांनी पहिल्या जबाबामध्ये दोषारोपाबाबत अखेरच्या निवेदनामध्ये सांगेन असे नमूद केले आहे.

२.विभागीय चौकशीमध्ये एकूण ०६ सरकारी साक्षीदार व जादाचे ०४ सरकारी साक्षीदार तसेच ०३ जादाचे खाजगी साक्षीदार तपासले आहेत.

३.अपचारी यांना तपासलेल्या सरकारी साक्षीदारांची उलट तपासणी घेण्याची संधी देण्यात आलेली आहे.

४.अपचारी यांना बचावाचे साक्षीदार देण्याची आणि त्यांची साक्ष नोंदविण्याची संधी देण्यात आली आहे.

५.अपचारी यांना बचावाच्या पूर्ण संधी,कालावधी,मदत व सवलती देण्यात आल्या आहेत.

६.अपचारी यांना विभागीय चौकशीचे अनुषंगाने कागदपत्रांच्या नकला व जबाबाच्या प्रती पुरविण्यात आल्या आहेत.

## चौकशीमधील निष्कर्ष :-

अपचारी यांचेवर विभागीय चौकशीत ठेवण्यात आलेल्या दोषारोप संबंधीचे निष्कर्ष खालीलप्रमाणे :-

मा.सत्र न्यायालय क्र.९, शिवाजीनगर न्यायालय पुणे या न्यायालयाकडील न्यायाधिन बंदी नामे १)विशाल शिंदे व २)दिपक पाटील या दोन न्यायाधिन बंदी यांचे दि.०३/११/२०१८ रोजी कोर्ट पेशीचे वॉरंट येरवडा कारागृह येथे इतर आरोपींचे वॉरंटाप्रमाणे पाठविण्यात आले होते त्याप्रमाणे येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथुन कैदी गाडी इंचार्ज पोलीस नाईक १९५० संतोष नेवसे, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे यांनी कैदी गाडीमधुन प्रथम ३९ आरोपी व नंतर दुसऱ्या कैदीपार्टीने ४ आरोपी शिवाजीनगर कोर्ट आवार लॉकअपमध्ये आणुन ठेवले होते. कोर्ट नं.९ येथे आरोपी नामे विशाल शिंदे या आरोपी करीता पोलीस कर्मचारी नामे १) पोलीस नाईक डगळे व २)पोलीस शिपाई विखे यांना डीओ पो.हवा.शेवाळे यांनी ड्युटीस नियुक्त केले होते, परंतु मा.न्यायालयाकडील वॉरंटावरुन आरोपी नामे दिपक पाटील हा जादा आरोपी येरवडा मध्यवर्ती कारागृहाकडुन कैदी गाडीतुन आलेला असल्याने पोलीस नाईक ८५० डगळे यांनी जादा आरोपी करीता परस्पर पोलीस शिपाई ४६६० पाटील यास घेवुन त्याबाबत कोर्ट आवार स्टेशन डायरीमध्ये नोंद केली असून त्याप्रमाणे पोलीस नाईक ८५० डगळे, पोलीस शिपाई ४६६० पाटील व पोलीस शिपाई १०७०४ विखे यांनी आरोपी नामे १)विशाल शिंदे व २)दिपक यशवंत पाटील यांना कोर्ट नं.९ मध्ये कोर्ट पेशीकरीता कोर्ट लॉकअप मधुन १२:२५ वा.ताब्यात घेतले व दोन्ही आरोपींना कोर्ट नं.९ येथे हजर करण्यासाठी घेवुन गेले त्यानंतर सदर आरोपीपैकी आरोपी नामे विशाल शिंदे यास दुपारी १४:०० वा.चे सुमारास कोर्ट लॉकअपमध्ये जमा केले आहे.

तसेच आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यास लॉकअपमध्ये जमा न करता **मा.न्यायालयाची परवानगी नसताना, सदर आरोपीस दि.०३/११/२०१८ रोजी दुपारी १४:०० वा.नंतर, परस्पर आरोपी दिपक पाटील याचा मुलगा सिध्दार्थ पाटील याचे खाजगी चार चाकी वाहनातुन आरोपी दिपक पाटील यास त्याचे घरी करिष्मा सोसायटी कोथरुड, पुणे येथे घेवुन जात असताना यातील साक्षीदार कॅ.अतुल वासुदेव दिवेकर, यांनी पोलीस नियंत्रण कक्ष पुणे येथे फोन करुन सदर घटना कळविली असुन पोलीस नाईक ८५० डगळे व पोलीस शिपाई ४६६० पाटील यांनी त्यांचे ताब्यातील आरोपी दिपक पाटील यास त्याचे घरी करिष्मा सोसायटी कोथरुड पुणे येथे घेवुन आले** त्या दरम्यान पोलीस नियंत्रण कक्ष यांचेकडुन अलंकार पो.स्टे. येथे दिलेल्या कॉल प्रमाणे अलंकार पो.स्टे.कडील पोलीस उप निरीक्षक श्री.शिनगारे व इतर पोलीस कर्मचारी यांनी आरोपी दिपक पाटील याचे घरी जावुन अपचारी पोलीस कर्मचारी व आरोपी दिपक पाटील यास अलंकार पोलीस स्टेशन, पुणे येथे आणले असुन त्यानंतर आरोपी दिपक पाटीस यास कोर्ट आवार लॉकअपमध्ये जमा केले आहे.

या विभागीय चौकशीमधील उपलब्ध कागदपत्रे व साक्षी पुराव्यावरुन अपचारी पोलीस कर्मचारी १)पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे २)पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील यांनी आपले कर्तव्यात गंभीर स्वरुपाची कसुर केली असुन त्यांनी आपले कर्तव्यात निष्काळजीपणा, हयगय व बेजबाबदारपणाचे गैरवर्तन केल्याचे सिध्द होत आहे.

**एकंदरीत** झाले विभागीय चौकशीवरुन असे निष्पन्न होत आहे की, अपचारी पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांचेवर विभागीय चौकशीमध्ये ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द होत आहे. अशाप्रकारे पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांनी अत्यंत बेकायदेशीर, बेपर्वा, बेशिस्त, बेजबाबदार, निष्काळजीपणा व पोलीस दलाची प्रतीमा मलीन करणारे गैरवर्तन केले आहे.

## अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,पुणे शहर यांचे समाकलन :-

विभागीय चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला अहवाल व त्यामधील निष्कर्षाचे मी अवलोकन केले आहे. अपचारी पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांना बचावाच्या पूर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. विभागीय चौकशीमध्ये ठेवण्यात आलेले व पहिल्या जबाबामध्ये त्यांनी नाकारलेले दोषारोपांचे अनुषंगाने स्वतःची बाजू मांडण्यासाठी ते स्वतः व त्यांचे मित्र अधिकारी हजर राहिलेले आहेत. अपचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशीमध्ये ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द झाल्याचा चौकशी अधिकारी यांनी जो निष्कर्ष काढलेला आहे, त्या निष्कर्षाशी मी पूर्णपणे सहमत आहे.

या विभागीय चौकशीचे अनुषंगाने मी चौकशी अधिकारी यांचेकडून प्राप्त नस्ती ०१ ते ०९ मधील नोंदविण्यात आलेले जबाब, पुराव्याची कागदपत्रे इ.कागदपत्रांचे देखील बारकाईने अवलोकन व वाचन केले आहे.शिस्तबध्द पोलीस दलामध्ये कायद्याचे पालन करणे, जनतेशी शासकीय लोकसेवक म्हणून चांगली वर्तणुक ठेवणे हे पोलीस कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. अपचारी पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर हे पोलीस मुख्यालय, पुणे शहर येथे कार्यरत होते. त्यांनी, येरवडा जेल येथील आरोपी काढणेबाबतचे मागणीपत्रात १ आरोपी काढणेबाबत उल्लेख केला असताना व त्यांना न्यायाधिन बंदीबाबत कर्तव्य नेमले असताना नमुद पोलीस कर्मचारी यांनी दोन आरोपी काढुन त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यास न्यायालयाची कार्यवाही झाल्यानंतर लॉकअपमध्ये जमा न करता मा.न्यायालयाची परवानगी नसताना, बेकायदेशीरपणे दि.०३/११/२०१८ रोजी दुपारी १४:०० वा.नंतर, परस्पर आरोपी दिपक पाटील याचा मुलगा सिध्दार्थ पाटील याचे खाजगी चार चाकी वाहनातुन आरोपी दिपक पाटील यास त्याचे घरी करिष्मा सोसायटी

कोथरुड, पुणे येथे घेवुन गेलेत. यावरुन अपचारी यांनी आपले कर्तव्यात गंभीर स्वरुपाची कसुर केली असुन त्यांनी आपले कर्तव्यात निष्काळजीपणा, हयगय व बेजबाबदारपणाचे गैरवर्तन केल्याचे सिध्द होत आहे.त्यामुळे अपचारी यांना यापुढे पोलीस खात्यात सेवेत ठेवणे उचित होणार नाही या निष्कर्षापर्यंत मी आलेलो आहे.

अशाप्रकारे अपचारी पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर यांनी बेकायदेशीर व बेशिस्त वर्तन करुन पोलीस दलाची प्रतीमा मलीन करणारे गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन केले असून, त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या व सिध्द झालेल्या दोषारोपाचे अनुषंगाने त्यांना मुंबई पोलीस अधिनियम (शिक्षा व अपिले) नियम १९५६ च्या नियम ३ व महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-१,नियम ४४९ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २५ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे.

## कारणे दाखवा नोटीस

तुम्ही, पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर तुम्हास **“ खात्यातून बडतर्फ करणे (Dismissal From Service) ”** ही शिक्षा का देण्यात येवू नये ? याबाबत सदर कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाले दिनांकापासन तुमचा लेखी खुलासा १० दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावा. तुमचा खुलासा मुदतीत प्राप्त झाल्यास, अंतिम निर्णय घेण्यापूर्वी तो विचारात घेण्यात येईल, अन्यथा तुम्हास काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन एकतर्फी अंतिम आदेश निर्गमित केले जातील याची नोंद घ्यावी.

(डॉ. संजय शिंदे)
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन
पुणे शहर

प्रति,

१.पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर
२.पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर

मार्फत- राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय, पूणे शहर.

२/- सदरच्या कारणे दाखवा नोटीसची मूळ प्रत दोन्ही अपचारी यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून ती प्रत या कार्यालयास उलटटपाली पोहोच करावी.

प्रत,

विभागीय चौकशीी शाखा,पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर.

रापोनि का... पुणे शहर
आवक क्र. ३८९
दाखल दिनांक २२/९/२०२०
शाखा/कार्यालय- PC/4660 पाटील

A NEXURE - A5

**सेवेतुन बडतर्फ का करणेत येवु नये. या प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसच्या शिक्षेचे उ-तर**

पुणे दिनांक /०२/२०२०

प्रति,

मा. अपर पोलीस आयुक्त,
प्रशासन पुणे शहर.

यांना सविनय सादर ....

प्रतिवेदक — पोशि/४६६० कमलेश बाळासाहेब पाटील ने. पो.मुख्यालय शिवाजीनगर पुणे शहर.

विषय - **विभागीय चौकशी -**
पोशि/४६६० कमलेश बाळासाहेब पाटील ने. पो. मुख्यालय शिवाजीनगर पुणे.

संदर्भ - १) माझे विरुध्दची विभागीय चौकशी मा. पोलीस उप आयुक्त मुख्यालय -२ पुणे शहर यांचेकडील आदेश क्र.पोउआ/मुख्या.-२/आस्था--१०/विचौ/पोना८५०-पोशि४६६०/७६९/२०१९ · दि०९/७/२०१९

२) अपर पोलीस आयुक्त, प्रशासन पुणे शहर यांचेकडील कादोना क्र.आस्था-१०/(१)/विचौ/कादानो/पोना-८५०,डगळे व पोशि६६६०/पाटील/१४०/२०२० दिनांक २०/०१/२०२०

———ooo———

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये वरील संदर्भ क्र.१ अन्वये माझ्या विरुध्द विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली होती. वरील संदर्भ क्र.२ अन्वये मला दिनांक २०/०१/२०२० रोजी विभागीय चौकशीची कारणे दाखवा नोटीस दिनांक २२/०१/२०२० रोजी प्राप्त झाली आहे. माझ्या विरुध्दच्या विभागीय चौकशीत दोषारोप सिध्द झाल्याचे गृहित धरुन मला खात्यातुन बडतर्फ करणे ही शिक्षा का देण्यात येवु नये अशी कारणे दाखवा नोटीस देणेत आलेली होती. परंतु सदर कारणे दाखवा नोटीस सोबत विभागीय चौकशी अधिकारी यांचे समाकलन अहवाल देणेत आलेला नव्हती. त्यामुळे सदर समाकलन अहवालाची प्रत मिळणे कामी मी दिनांक २७/०१/२०२० रोजी विनंती अर्ज सादर केला होता. त्यानुसार मला दिनांक १/०२/२०२० रोजी चौकशी अधिकारी यांचे समाकलन अहवाल प्राप्त झाला आहे. समालन अहवाल प्राप्त झाले पासुन मी नियमा प्रमाणे मुदतीत १० दिवसाचे आत मुदतीत उ-तर सादर करीत आहे.

माझ्या विरुध्दच्या विभागीय चौकशीत माझेवर ठेवणेत आलेले दोषारोप खालील प्रमाणे आहेत.

५६

**दोषारोप –**

कर्तव्यात बेशिस्त बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनियम असे वर्तन की, ज्यात पोना/८५० नामदेव डगळे पोशि/४६६० कमलेश बाळासाहेब पाटील ने. पोलीस मुख्यालय पुणे शहर यांचे विरुध्द खालील प्रमाणे दोषारोप ठेवणेत येत आहेत.

पोना/८५० नामदेव डगळे पोशि/४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोन्ही नेमणूक पोलीस मुख्यालय हे येरवडा जेल येथील आरोपी काढणे बाबतचे मागणी पत्रात एक आरोपी काढणे बाबत उल्लेख केले असताना व त्यांनाही न्यायाबंदी बाबत कर्तव्य नेमले असताना नमुद पोलीस कर्मचारी यांनी दोन आरोपी काढुन त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यास बेकायदेशीरपणे त्याचे राहते घरी घेवुन गेले बाबत कसुरी केली आहे.

अशा प्रकारे पोना/८५० नामदेव डगळे व पोशि/४६६० कमलेश बाळासाहेब पाटील नेमणुक पोलीस मुख्यालय पुणे शहर यांनी शासकीय सेवेत सचोटी कर्तव्य परायणता राखणे आवश्यक असताना शासकीय सेवकास अत्यंत अशोभनिय असे वर्तन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम क्र.३ चे जाणीव पुर्वक उल्लंघन केले आहे.

अशा पोना/८५० नामदेव डगळे व पोशि/४६६० कमलेश बाळासाहेब पाटील ने. पोलीस मुख्यालय पुणे शहर यांनी जबाबदार पदी कर्तव्यास कार्यरत असताना शिस्तपालणाची अमंलबजावणी करण्यास गंभीर स्वरुपाची कसुरी केली. आणि शिस्तब्द पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणारी आणि पोलीस दलाच्या हितसंबंधास अपाय करणारी बेशिस्त बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनिय असे गंभीर स्वरुपाचे वर्तन केलेने तुम्ही मुंबई पोलीस अधिनिय (शिक्षा व अपिले) नियम १९५६ च्या नियम ३ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २५ मध्ये नमुद केलेल्या शिक्षेस पात्र आहात.

**दोषारोप अभिकथन** -

पोना/८५० नामदेव डगळे पोशि/४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोन्ही नेमणुक पोलीस मुख्यालय हे येरवडा जेल येथील आरोपी काढणे बाबतचे मागणीपत्रात एक आरोपी काढणे बाबत उल्लेख केला असताना व त्यांनाही न्यायाबंदी बाबत कर्तव्य नेमले असताना नमुद पोलीस कर्मचारी यांनी दोन आरोपी काढुन त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यांस बेकायदेशीरपणे त्यांचे राहते घरी घेवुन गेले बाबत कसुरी केली आहे.

अशा प्रकारे पोना/८५० नामदेव डगळे पोशि/४६६० कमलेश बाळासाहेब पाटील नेमणूक पोलीस मुख्यालय पुणे शहर यांना जबाबदारपदी कर्तव्यास कार्यरत असताना शिस्तपालणाची अंमलबजावणी करण्यास गंभीर स्वरुपाची कसुरी केली आणि शिस्तबध्द पोलीस दलाची प्रतिमा मलीन करणारे आणि पोलीस दलाच्या हितसंबंधास अपाय करणारी बेशिस्त बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनिय असे गंभीरस्वरुपाचे वर्तन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम क्र.३ चे जाणीव पुर्वक उल्लंघन केले आहे.

तेसच तुमचेवर ठेवलेले वरील दोषारोप चौकशीत सिध्द झाल्यास तुम्ही मुंबई पोलीस अधिनियम (शिक्षा व अपिले ) नियम १९५६ च्या नियम ३ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २५ मधील नमुद केलेल्या शिक्षेस पात्र आहात.

**<u>सरकारी साक्षीदारांची यादी –</u>**

१. श्री. पंकज गुणवंतराव ि ानगारे पोलीस उप निरीक्षक ने अलंकार पोस्टे पुणे भाहर
2 श्री सुनिल द ारथ मोरे पोहवा बंनं 5523 नेमणुक अलंकार पोस्टे पुणे भाहर
3 श्री. सगर ि ावाजी रानगे पोि ा ब नं 8696 अलंकार पोस्टे पुणे भाहर
4 श्री अजिनाथ दिनकर खेडकर पोि ा ब नं 10149 ने अलंकार पोस्टे पुणे भाहर
5 श्री दत्तात्रय भिव ान विखे पोि ा ब नें 10704 ने पोलीस मुख्यालय पुणे भाहर
6 श्री कृश्णा वसंत भोवाळे पोहवा ब नं 3092 ने पोलीस मुख्यालय पुणे भाहर
7 श्री नामदेव दादाभा डगळे पोना ब नं 850 ने पोलीस मुख्यालय पुणे भाहर
8 श्री कमले ा बाळासाहेब पाटील पोि ा ब नं 4660 ने पोलीस मुख्यालय पुणे भाहर.

<u>जदाचे सरकारी साक्षीदार</u>

1 सपोफौ. पोपळघट नेमणूक कोर्ट आवार पोलीस मुख्यालय ि ावाजीनगर पोलीस मुख्यालय

2 सपोफौ गोगावले नेमणूक कोर्ट कंपनी पोलीस मुख्यालय ि ावाजीनगर पोलीस मुख्यालय

3 पोना 1950 नेवसे नेमणूक कोर्ट कंपनी पोलीस मुख्यालय ि ावाजीनगर पोलीस मुख्यालय

4 पोि ा 4296 लोहार नेमणूक कोर्ट कंपनी पोलीस मुख्याय ि ावाजीनगर पोलीस मुख्यालय

<u>बचावाचे साक्षीदार</u>

१. चा.पो.हवा.३५६२विष्णू आनंदा लगड ने. मो.प.वि.पोलीस मुख्यालय शिवाजी नगर पुणे शहर.
२. पोना/ ३८५४ गुलाब लक्ष्मण बांबळे, ने. पोलीस मुख्यालय शिवाजीनगर पुणे शहर.
३. पोशि/४७९६ प्रकाश देवराम चौधरी, ने. पोलीस मुख्यालय शिवाजीनगर पुणे शहर.
४. पोशि/ ४७२० संजय दयाराम चव्हाण, ने. पोलीस मुख्यालय शिवाजीनगर पुणे शहर.

मला दिलेल्या कारणे दाखवा नोटीस सोबत विभागीय चौकशी अधिकारी यांचे समाकलन अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालाचे मी अवलोकन केले आहे. चौकशी अधिकारी यांनी नोंदविलेल्या

निष्कर्षाशी मी वाचले असुन त्याच्या निष्कर्षाशी मी सहमत नाही. त्या संदर्भाने माझे म्हणणे खालील प्रमाणे सादर करीत आहे.

**विभागीय चौकशी अधिकारी यांचे समाकलन अहवाल**

विभागीय चौकशी अधिकारी यांनी त्यांचे समाकलन अहवालामध्ये नमुद केलेल्या मताशी मी अजिबात सहमत नाही. कारण नमुद चौकशीतील सर्व सरकारी साक्षीदार व जादाचे सरकारी साक्षीदार यांनी स्पष्टपणे सांगितलेले आहे की, मी येरवडा जेल येथुन आरोपी दिपक पाटील व विशाल शिंदे यांना काढलेले नाही. तसेच येरवडा जेल प्रशासन कर्मचारी पोहवा/लोंढे व पोशि/चौधरी यांनी दिनांक ३/११/२०१८ रोजी पोना/१९५० नेवसे यांच्या ताब्यात ३९ आरोपी दिले होते. त्यामध्ये कोर्ट नं.९ चे दोन आरोपी विशाल शिंदे व दिपक पाटील यांना आणण्यात आले होते. सदर बाबत येरवडा जेल कडील पत्र क्र. येमका/मा.अ.नि.-२००५/३६७७/२०१९ दिनांक २०/८/२०१९ कळविलेले आहे. (त्याची छायाकिंत सत्य प्रत सोबत सादर करणेत येत आहे.) . त्यामुळे सदर आरोपीस मी स्वतःहुन जेल मधुन काढलेले नाही. सदरची बाब विभागीय चौकशीत चौकशी अधिकारी यांचे निदर्शनास आणुन देणेत आलेली होती. असे असताना देखील चौकशी अधिकारी यांनी न्यायाची बाजु मांडणे उचित होते, परंतु त्यांनी सदर दोषारोपा बाबत मौन बाळगुन दोषारोपास पृष्ठी देणेची भुमिका घेतलेली आहे. व सत्य परिस्थिती लपविलेली असल्याचे सिध्द होत आहे.

आरोपी दिपक पाटील यांस आम्ही परस्पर त्यांचे राहते घरी घेवुन गेलो हा जो निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढलेला आहे. तो मला आजिबात मान्य नाही. कारण आरोपी दिपक पाटील यांनी कोर्ट नं.९ चे मा.न्यायालय यांना विनंती केली होती की, पत्नी आजारी असलयाने मला तिला भेटावयाचे आहे तरी आपण मला परवानगी द्यावी. अशी विनंती केली होती. त्यावेळी आरोपीस तुमचे वकिला मार्फत लेखी अर्ज देणेस सांगितले व कोर्ट जेवणासाठी उठुन गेले होते. त्यावेळी न्यायालयाने त्यांची विनंती मान्य केली आहे असा आमचा समज झाल्याने व आरोपी दिपक पाटील हा आम्हास वारंवार विनंती करत होते की, मला माझे आजारी पत्नीस भेटणे कामी घेवुन चला असे म्हणत होता. म्हणुन आम्ही कोर्ट आवारातील मुख्यालया कडील पोलीस अधिकारी यांचे निर्दशनास सदर बाबत आणुन त्याचे परवानगी घेणेसाठी कोर्ट आवारात शोध घेतला असता पोनि/भोसले व मपोउनि/थोरात हे तेथे हजर नसल्याने (स्टेशन डायरीमध्ये पोनि/भोसले हे दि.३/११/२०१८ रोजी १५.३० नोंद क्र. २५ येथे शिवाजी नगर पो.मुख्यालय कोर्ट कंपनीत हजर झाले म्हणुन नोंद आहे. व मपोउनि/स्नेहल थोरात या दिनांक ३/११/२०१८ रोजी नोंद क्र.२८ येथे मुख्यालयातील काम संपवून चकर येऊ लागल्याने दुपारी १.३० वा. निवासस्थानी गेल्याची नोंद आहे. त्याची सत्य प्रत सोबत जोडली आहे.) डीओ/शेवाळे यांचेकडे सदर आरोपीस घेवुन गेलो होतो. कारण डीओ/शेवाळे यांचे तोंडी आदेशा प्रमाणेच कोर्ट कंपनीचे दैनदिन कामकाज चालते म्हणूनच आम्ही डीओ/शेवाळे यांना सदरची हकिगत कथन करुन व समक्ष आरोपीने डीओ/शेवाळे यांनी विनवनी केल्याने शेवाळे यांचे तोंडी परवानगी दिल्यानेच आम्ही नमुद आरोपीस त्यांचे राहते

घरी घेवुन गेलो होता. आरोपी पळुन जावु नये म्हणुन पोशि.पाटील यांचे हातात बेडीची एक बाजु व दुसरी आरोपीच्या हातात अडकविणेत आलेली होती. तसेच रसीने देखील त्याला बांधण्यात आलेले होते. वरील सर्व घटना ही सरकारी साक्षीदार व जादाचे साक्षीदार यांनी देखील विभागीय चौकशी दरम्यान साक्षीमध्ये कथन केलेली आहे. असे असताना देखील चौकशी अधिकारी यांनी मी आरोपीस त्यांचे राहते घरी परस्पर घेवुन गेलो हे काढलेले निष्कर्ष चुकीचे आहेत. तरी आपण मी वरील प्रमाणे सादर केलेल्या सर्व घटनांचा बारकाईने अभ्यास केल्यास आपल्या निदर्शनास येईल की, आरोपी दिपक पाटील यांस आम्ही आमच्या अधिकारात त्याचे राहते घरी घेवुन गेलेलो नव्हतो. हे सिध्द होत आहे.

**<u>अपर पोलीस आयुक्त, प्रशासन पुणे शहर यांचे समाकलन अहवाल</u>**

मा.अपर पोलीस आयुक्त प्रशासन पुणे शहर यांनी त्यांचे समाकलन अहवालामध्ये अपचारी यांचेवर दोषारोप सिध्द कसे होतात. याबाबत कोणत्या सरकारी साक्षीदाराने साक्ष दिलेली आहे. याबाबतचा काही एक उल्लेख केलेला नाही. अपचारी यांचेवर ठेवणेत आलेले दोन दोषारोप कसे सिध्द होतात याबाबत त्यांनी विवेचन करणे गरजेचे होते. परंतु त्यांनी मोघम स्वरुपात अपचारी यांचे विरुध्द ठेवणेत आलेले दोषारोप सिध्द होत असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु दोषारोप कसे सिध्द होतात याबाबत त्यांनी काही एक मत मांडलेले नाही. माझ्यावर ठेवणेत आलेला दोषारोपा बाबत खालील प्रमाणे माहिती कथन करीत आहे.

**<u>दोषारोप -</u>**

पोना/८५० नामदेव डगळे पोशि/४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोन्ही नेमणूक पोलीस मुख्यालय हे येरवडा जेल येथील आरोपी काढणे बाबतचे मागणी पत्रात एक आरोपी काढणे बाबत उल्लेख केले असताना व त्यांनाही न्यायाबंदी बाबत कर्तव्य नेमले असताना नमुद पोलीस कर्मचारी यांनी दोन आरोपी काढुन त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यास बेकायदेशीरपणे त्याचे राहते घरी घेवुन गेले बाबत कसुरी केली आहे.

नमुद दोषारोपाचे दोन विभाग होत आहे. एक म्हणजे मी येरवडा जेल येथील आरोपी काढणे बाबतचे मागणी पत्रात एक आरोपी काढणे बाबतचा उल्लेख असताना मी दोन न्यायाबंदी काढले बाबत नमुद करण्यात आले आहे.

त्या बाबत माझे सांगणे की, माझी डयुटी ही फक्त शिवाजीनगर कोर्टातुन आरोपीस कोर्टा समोर पेशी करण्याची होती. त्यामुळे मी **<u>येरवडा जेल येथुन आरोपीस काढले बाबत जो दोषारोप ठेवणेत आलेला आहे. तो पुर्णतः चुकीचा आहे. येरवडा जेल येथुन कैदी गाडीतील इनचार्ज पोनाबनं.१९५० नेवसे यांनी ३९ न्यायाबंदीना येरवडा जेल येथुन डीओ/शेवाळे व वरि ठयांचे आदेशा वरुन घेवुन आले असल्याचे त्यांनी विभागीय चौकशी दरम्यान स्पष्टपणे सांगितलेले आहे.</u>** तसेच यरेवडा जेल यांची छायांकित प्रत ही बचावाचे अंतिम निवेदन सादर करणेची वेळी सोबत सादर करण्यात आलेली होती. तसेच शिवाजी नगर कोर्ट लॉकअपचे इनचार्ज सपोफौ/पोपळघट यांनी श्री.नेवणे यांच्याकडुन ३९ आरोपी कैदी गाडीतुन जमा करुन घेतले

असल्याचे विभागीय चौकशी दरम्यान स्पष्टपणे सांगितलेले आहे. <u>नमुद आरोपी दिपक पाटील यांस व विशाल शिंदे यांना सपोफौ/पोपळघट यांनी अपचारी/पोना डगळे यांचे ताब्यात कोर्ट पेशी करीता सादर करणेसाठी दिले असल्याचे त्यांनी स्वतः विभागीय चौकशीत स्पष्टपणे सांतिलेले आहे. त्यामुळे मी नमुद आरोपीस परस्पर येरवडा जेल येथुन काढले हे म्हणणे पुर्णतहा चूकीचे आहे. त्यामुळे सदरचा दोषारोप हा माझ्यावर सिध्द होवु शकत नाही.</u> कारण मला डीओ/ शेवाळे यांनी शिवाजीनगर कोर्ट लॉकअप येथुन कोर्टामध्ये आरोपी पेशी करणे एवढीच डयुटी तोंडी आदेशाने दिलेली होती.त्यामुळे मला वरील दोशारोपातुन मुक्त करणेत यावे ही हुजुरास नम्र विनंती आहे

**१) <u>विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९८१ मध्ये नियम क्रमांक ६.४ मधील (३) (अ) (ब) (क) (ड) या नियमांचे पालन झालेले नाही. हे स्पष्टपणे दिसुन आले आहे. त्यामुळे नमुद विभागीय चौकशीमध्ये गंभीर स्वरुपाची अनियमितता झालेली आहे. त्यामुळे सदर विभागीय चौकशी रददबाद होणे क्रमप्राप्त आहे..</u>**

२) तसेच माझ्या विरुध्द ठेवणेत आलेला दोषारोप हा चुकीच्या घटनेवर आधारीत ठेवणेत आलेला आहे. याबाबत सन्माननिय मा. सर्वोच्च न्यायायलय यांचेकडील खालील प्रमाणे न्यायनिवाडे अवलोकन होणेस विनंती आहे.

Surath Chandra Chakrabarty Vs State of West Bengal on 14th Dec.1970 AIR 752, SCR (3) 1

माझ्यावर ठेवणेत आलेला दोषारोप हा मोघम स्वरुपात ठेवणेत आल्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा भग होवुन मला बचावाच्या संधी पासुन वंचित राहवे लागते आहे.

आरोपी दिपक पाटील यांस कोर्ट पेशीचे कामकाज संपल्या नंतर मी त्यांचे राहते घरी बेकायदेशीरपणे घेवुन गेलो असा दोषारोप आहे.

याबात माझे सांगणे की, आरोपीची कोर्ट पेशी कोर्ट क्र.९ येथे संपल्या नंतर त्यांनी कोर्टास विनंती केली होती की, त्यांची पत्नी आजारी असल्याने तिला घरी जावुन भेटणेची परवानगी मिळणे बाबत विनंती केली होती. त्यावेळी कोर्ट जेवणसाठी उठले होते. त्यांचा विनंतीचा विचार झाला असा आमचा समज झाल्याने व आरोपी दिपक पाटील हा वारंवार आजारी पत्नीस भेटनची विनंती करु लागल्याने आम्ही सदरचा प्रकार कोर्ट कंपनीचे अधिकारी यांना सांगणेसाठी कोर्ट आवारात एकही पोलीस अधिकारी तेथे हजर नव्हते. त्यामुळेच आम्ही डीओ/शेवाळे यांचेकडे आरोपी दिपक पाटील यांचेसह भेटलो त्यावेळी आरोपी दिपक पाटील यांनी हांत जोडुन डीओ/शेवाळे यांना विनंती केली की, त्यांची पत्नी खुप आजारी असल्याने मला तिला पहाणे आवश्यक आहे. तरी आपण नमुद पोलीस कर्मचारी यांचे सोबत मला माझे पत्नीस भेटण्याची परवानगी द्यावी मी कोर्टाला देखील विनंती केली आहे. अशी विनती केली. त्यामुळे डीओ/शेवाळे यांनी आम्हास दिलेल्या तोंडी आदेशा प्रमाणे आम्ही नमुद आरोपीस त्यांचे आजारी पत्नीस भेटणेसाठी गेलो होते. आरोपी पळुन जावु नये म्हणुन त्यांचे हातात बेडी घालणेत आलेली होती. व बेडीची दुसरी बाजु पोशि.४६६०

-1

पाटील यांचे हातात होती. तसेच आरोपीस दोरीने देखील बांधणेत आलेले होते. आरोपी पळुन जावु नये यांची पुर्ण खबरदारी आम्ही घेतलेली होती.सरकारी साक्षीदार पोउपनि/शिनगारे हे दिनांक ३/११/२०१८ रोजी आरोपीच्या घरी आले होते त्यावेळी आरोपीची पत्नी ही आजारी असल्याचे त्यानी पाहिले असल्याचे विभागीय चौकशीत सांगितले आहे. तसेच आरोपी पळुन जावु नये याची पुर्ण खबरदारी अपचारी यांनी घेतली असल्याचेदेखील सांगितलेले आहे.

सरकारी साक्षीदार यांनी आरोपी दिपक पाटील यांस डीओ/ शेवाळे यांचे सोबत हात जोडुन बोलताना पाहिलेले आहे. याचाच अर्थ आम्ही स्वतःचे अधिकारात आरोपीस त्यांचे राहते घरी त्याचे आजारी पत्नीस भेटणेसाठी गेलेलो नाही. आम्हास डीओ/शेवाळे यांनी दिलेल्या तोंडी आदेशा प्रमाणेच आरोपीस त्यांचे घरी घेवुन गेलेलो आहे. आम्ही आरोपीस त्यांचे घरी घेवुन जाणेस जेवढे जबाबदार आहोत. तेव्हढेच डीओ/शेवाळे हे देखील जबाबदार आहेत. जर डीओ/ शेवाळे यांनी आम्हास आरोपीस त्यांचे घरी घेवुन जाणेचे आदेश दिले नसते. तर आज आम्हास विभागीय चौकशीस व आपण दिलेल्या कारणे दाखवा नोटीसला समोर जाण्याचा प्रश्नच आला नसता. विभागीय चौकशीमध्ये सर्व सरकारी साक्षीदार व जादाचे सरकारी साक्षीदार यांनी देखील स्पष्टपणे सांगितलेले आहे की, आरोपी दिपक पाटील यास डीओ/शेवाळे यांचे आदेशानेच घेवुन गेलेले आहेत. तसेच येरवडा जेल मधुन जे ३९ आरोपी कोर्ट पेशी करीता दिनांक ३/११/२०१८ रोजी काढणेत आलेले आहेत. त्यामध्ये आरोपी विशाल शिंदे व आरोपी दिपक पाटील हे दोघे ही होते. नमुद आरोपीस आम्ही स्वतः परस्पर कोर्ट पेशी करीता काढलेले नाहीत.

नमुद विभागीय चौकशीमध्ये सरकारी साक्षीदार यानी दिलेल्या साक्षीवरुन नोंदविलेले दिसुन येत नाही. माझेवर ठेवणेत आलेला दोषारोप मी येरवडा जेलमधुन आरोपीस परस्पर काढले आहे त्याबाबत माझे सांगणे की, <u>मला दिनांक ३/११/२०१८ रोजी डयुटी ही शिवाजीनगर कोर्ट लॉकअप येथील न्यायालयीन बंदी यांना फक्त कोर्टात पेश करण्याची डयुटी होती.</u>

<u>वरील नमुद प्रमाणे मला डयुटी असताना माझ्यावर ठेवणेत आलेला दोषारोप हा आहे की, मी आरोपीस येरवडा जेल मधुन आरोपी परस्पर काढले आहे. सदरचा दोषारोप हा पुर्णतः चुकीचा आहे.</u> कारण विभागीय चौकशी दरम्यान सर्व सरकारी साक्षीदार यांनी दिलेल्या साक्षीमध्ये स्पष्टपणे नमुद केले आहे की, मी, आरोपी दिपक पाटील यांस येरवडा जेल येथुन आणले नसुन फक्त मी नमुद आरोपीस कोर्ट लॉकअप येथुन न्यायालयीन बंदी दिपक पाटील व विशाल शिंदे याना कोर्ट नं.९ येथे पेश करणेसाठी नेले होते. त्यामुळे मी आरोपीस येरवडा जेल येथुन आणले हा माझेवर ठेवणेत आलेला दोषारोप चुकीचा आहे. माझ्यावर ठेवणेत आलेल्या दोषारोपा संदर्भाने खालील प्रमाणे गंभीर अनियमितता झालेली आहे.

१) <u>विभागीय चौकशी नियम पुस्तिका १९८१ मध्ये नियम क्रमांक ६.४ मधील (३) (अ) (ब) (क) (ड) या नियमांचे पालन झालेले नाही. हे स्पष्टपणे दिसुन आले आहे. त्यामुळे नमुद विभागीय चौकशीमध्ये गंभीर स्वरुपाची अनियमितता झालेली आहे. त्यामुळे सदर विभागीय चौकशी रददबाद होणे क्रमप्राप्त आहे..</u>

52

२) तसेच माझ्या विरुध्द ठेवणेत आलेला दोषारोप हा चुकीच्या घटनेवर आधारीत ठेवणेत आलेला आहे. याबाबत सन्माननिय मा. सर्वोच्च न्यायायलय यांचेकडील खालील प्रमाणे न्यायनिवाडे अवलोकन होणेस विनंती आहे.

Surath Chandra Chakrabarty Vs State of West Bengal on 14th Dec.1970 AIR 752, SCR (3) 1

माझ्यावर ठेवणेत आलेला दोषारोप हा मोघम स्वरुपात ठेवणेत आल्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा भग होवुन मला बचावाच्या संधी पासुन वंचित राहवे लागते आहे.

नमुद दोषारोपा बाबत मी विभागीय चौकशीतील बचावाचे अंतिम निवेदनामध्ये त्याबाबत माझे म्हणणे मांडलेले होते. परंतु चौकशी अधिकारी व मला शिक्षा प्रस्तावित करणारे सक्षम अधिकारी यांनी मी सादर केलेल्या उ-तराचा अजिबात विचार न करता एकतर्फी निर्णय घेतल्याचे त्यांनी दिलेल्या कारणे दाखवा नोटीस वरुन दिसुन येत आहे. त्यासाठी मी परत माझे सविस्तर दोषारोपाचे संदर्भाने म्हणणे खालील प्रमाणे सादर करीत आहे. तरी त्याचा सहानुभुतिपुर्वक विचार होवुन मला प्रस्तावित केलेली शिक्षा रदद्बाद होणेस नम्र विनंती आहे.

नमुद विभागीय चौकशीमध्ये जादाचे सरकारी साक्षीदार सपोफौ/गोगावले यांनी प्रश्न क्र.६ अनुसार सांगितले आहे की, दिनांक ३/११/२०१८ रोजी भाडीगेट येथे असलेले जेलचे कर्मचारी यांनी ३९ न्यायालयीन बंदी माडीगेट येथे कैदी गाडीच्या ताब्यात दिले होते त्यामध्ये दिपक पाटील हा बंदी होता असे स्पष्टपणे सांगितले आहे. याचाच अर्थ नमुद आरोपीस मी येरवडा जेल मधुन बाहेर काढलेले नाही.

नमुद विभागीय चौकशीमधील सरकारी साक्षीदार पोना/नेवसे यांनी प्रश्न क्र. ५ व ६ चे उ-तर देताना आरोपी दिपक पाटील यास जेल पोलीसांनी वारंटप्रमाणेच त्यांचे ताब्यात दिला होता. दिनांक ३/११/२०१८ रोजी कोर्ट पेशी करीता आणलेल्या ३९ आरोपीमध्येच दिपक पाटील हा आरोपी आणला असल्याचे ते सांगत आहेत. तसेच <u>डीओ/शेवाळे यांनी कोर्ट नं.९ येथे आरोपी दिपक पाटील यांस पेशी करणेसाठी पोना/डगळे व पोशि/पाटील यांना ड्युटी लावल्याचे प्रश्न क्र. १६चे उ-तरामध्ये सांगितले आहे. नमुद साक्षीदार यांनी वरील प्रमाणे दिलेल्या साक्षीवरुन माझेवर विभागीय चौकशीत ठेवणेत आलेला दोषारोप सिध्द होवु शकत नाही.</u>

<u>दोषारोप भाग.१</u> मध्ये नमुद आरोपी दिपक पाटील यांस येरवडा झेल येथुन अपचारी यांनी परस्पर आणलेले नसुन त्यास अपचारी यांनी शिवाजीनगर लॉकअप येथुन कोर्ट पेशी करीता ताब्यात घेतलेले आहे. त्यामुळे मा. अपर पोलीस आयुक्त, प्रशासन यांनी त्यांचे वरील संदर्भ क्रमांक २ प्रमाणे काढलेल्या कारणे दाखवा नोटीसमध्ये त्याचे निष्कर्ष अहवालामध्ये मत मांडलेले आहे .त्या संदर्भाने माझे सांगणे की, मा. सत्र न्यायालय क्र.९ शिवाजीनगर न्यायालय पुणे या

न्यायालकयाकडील न्यायाधीन बंदी नामे १) विशाल शिंदे व २) दिपक पाटील या दोन न्यायाधीन बंदी यांची दिनांक ३/११/२०१८ रोजी कोर्ट पेशीचे वॉरंट येरवडा कारागृह येथे इतर आरोपीचे वॉरंटा प्रमाणे पाठविणेत आले होते. त्याप्रमाणे येरवडा मध्यवर्ती कारागृह येथुन कैदी गाडी इनचार्ज पोना/१९५० संतोष नेवसे ने. पोलीस मुख्यालय पुणे यांनी कैदी गाडीतुन एकूण ३९ आरोपी शिवाजी नगर कोर्ट लॉकअप येथे आणुन ठेवले होते. **वरील प्रमाणे सरकारी साक्षीदार यांनी दिलेल्या साक्षी पुराव्यावरन माझेवर ठेवणेत आलेला दोशारोप मी येरवडा जेल मधुन आरोपी परस्पर काढला हा सिध्द होवु शकत नाही**

**दोषारोप भाग.2** आरोपी दिपक पाटील यांस आम्ही परस्पर त्यांचे राहते घरी घेवुन गेलो हा जो निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढलेला आहे. तो मला आजिबात मान्य नाही. कारण आरोपी दिपक पाटील यांनी कोर्ट नं.९ चे मा.न्यायालय यांना विनंती केली होती की, पत्नी आजारी असलयाने मला तिला भेटावयाचे आहे तरी आपण मला परवानगी द्यावी. अशी विनंती केली होती. त्यावेळी आरोपीस तुमचे वकिला मार्फत लेखी अर्ज देणेस सांगितले व कोर्ट जेवणासाठी उठुन गेले होते. त्यावेळी न्यायालयाने त्यांची विनंती मान्य केली आहे असा आमचा समज झाल्याने व आरोपी दिपक पाटील हा आम्हास वारंवार विनंती करत होते की, मला माझे आजारी पत्नीस भेटणे कामी घेवुन चला असे म्हणत होता. म्हणुन आम्ही कोर्ट आवारातील मुख्यालया कडील पोलीस अधिकारी यांचे निर्देशनास सदर बाबत आणुन त्याचे परवानगी घेणेसाठी कोर्ट आवारात शोध घेतला असता पोनि/घोराले व मपोउनि/थोरात हे तेथे हजर नसल्याने (स्टेशन डायरीमध्ये पोनि/भोसले हे दि.३/११/२०१८ रोजी १५.३० नोंद क्र. २५ येथे शिवाजी नगर पो.मुख्यालय कोर्ट कंपनीत हजर झाले म्हणुन नोंद आहे. व मपोउनि/स्नेहल थोरात या दिनांक ३/११/२०१८ रोजी नोंद क्र.२८ येथे मुख्यालयातील काम संपवून चकर येऊ लागल्याने दुपारी १.३० वा. निवासस्थानी गेल्याची नोंद आहे. त्याची सत्य प्रत सोबत जोडली आहे.) डीओ/शेवाळे यांचेकडे सदर आरोपीस घेवुन गेलो होतो. कारण डीओ/शेवाळे यांचे तोंडी आदेशा प्रमाणेच कोर्ट कंपनीचे दैनदिन कामकाज चालते म्हणूनच आम्ही डीओ/शेवाळे यांना सदरची हकिगत कथन करुन व समक्ष आरोपीने डीओ/शेवाळे यांनी विनवनी केल्याने शेवाळे यांचे तोंडी परवानगी दिल्यानेच आम्ही नमुद आरोपीस त्यांचे राहते घरी घेवुन गेलो होता. आरोपी पळुन जावु नये म्हणुन पोशि.पाटील यांचे हातात बेडीची एक बाजु व दुसरी आरोपीच्या हातात अडकविणेत आलेली होती. तसेच रसीने देखील त्याला बांधण्यात आलेले होते. वरील सर्व घटना ही सरकारी साक्षीदार व जादाचे साक्षीदार यांनी देखील विभागीय चौकशी दरम्यान साक्षीमध्ये कथन केलेली आहे. असे असताना देखील चौकशी अधिकारी यांनी मी आरोपीस त्यांचे राहते घरी परस्पर घेवुन गेलो हे काढलेले निष्कर्ष चुकीचे आहेत.

त्यामुळे माझ्यावर ठेवणेत आलेला दोषारोष सिध्द होत असले बाबत आपण जो अनुमान काढलेला आहे. तो पुर्णतः चुकीचा आहे. तरी वरील प्रमाणे कारणे दाखवा नोटीसमध्ये मला जी शिक्षा प्रस्तावित करणेत आलेली आहे. त्यामधुन निर्दोष मुक्तता होणेस नम्र विनंती आहे.

नमुद विभागीय चौकशीत माझेवर ठेवणेत आलेला दोषारोप सिध्द होत नाही. त्यामुळे मी आपण नमुद केलेल्या शिक्षेस पात्र ठरण्याचा प्रश्नच उदभवत नाही. तरी वरील नमुद दोषारोपातुन माझी निर्दोष मुक्तता होणेस नम्र विनती आहे.

माझ्या विरुध्दच्या विभागीय चौकशीमध्ये खालील प्रमाणे गंभीर अनियमितता झालेली आहे. तरी त्यांचा याठीकाणी विचार होणेस विनंती आहे.

५) माझेवर ठेवणेत आलेले दोषारोप हे मोघम स्वरुपाचे आहेत. दोषारोप तयार करताना दोषारोपा संदर्भाने घडलेल्या घटनेचा संबंध नसता दोषारोप वाढविलेला आहे.
६) पोलीस कर्मचारी यांना शिक्षा देताना त्या टप्याटप्याने देणे बाबत पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे परीपत्रक क्रपोमसं/११/२२/(डीई)/२००३ दिनांक१/४/२००३ प्रमाणे कसुरीच्या प्रमाणात शिक्षा देणे बाबत नमुद आहे.
७) महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-१ नियम-४४९ मधील नियम क्र. ३ व ५ चे अवलोकन होणेस विनंती आहे. कर्मचा-यास शिक्षा देताना त्याची झालेली सेवा विचारात घेणे आवश्यक आहे. एकदम खात्यातुन काढुन टाकण्याची शिक्षा देवु नये.
८) विभागीय चौकशीही एक वर्ष प्रदिर्घ कालावधीने नियमबाहयरित्या आदेशीत करण्यात आलेली आहे.

मी पोलीस आयुक्तालय पुणे शहर यांचे आस्थापनेवर दिनांक २०/७/२०१६ मध्ये भरती झालो आहे. मी दिनांक ८/५/२०१७ रोजी पोलीस शिपाई पदाचे मुलभुत प्रशिक्षण नानवीज दौंड येथे यशस्वीरित्या पुर्ण करुन मी शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथे हजर झालो आहे.त्यानंतर मी अे कंपनी येथे गार्ड डयुटीचे कर्तव्य बजाविले आहे. माझी सन-२०१७ रोजी कोर्ट कंपनी येथे नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक २/१/२०१८ रोजी मा. पोलीस उप आयुक्त, मुख्यालय पुणे शहर यांनी माझीं निवड कॉऊटर इन्सरजेसी ऑफ ॲन्टी टेररीस्ट कोर्स ( सीआयएटी ) सिताबर्डी नागपूर येथे पाठविणेत आले होते सदरचा ४५ दिवसाचा खडतर कोर्स मी यशस्वीरित्या पुर्ण केला आहे. त्याचे प्रमाणपत्र मला मिळालेले आहे. त्यांची छायाकिंत प्रत सोबत सादर करण्यात आली आहे. मी विविध राज्यत आरोपी पार्टीचे बंदोबस्त उ-तररित्या केलेले आहे. तसेच पुणे जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मी महत्वाचे बंदोबस्त प्रामाणीकपणे पार पाडले आहेत. माझा सेवाकाळात मला अद्याप पर्यंत एकही शिक्षा झालेली नाही.

मी पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील ग्रामीण भागातील रहिवासी आहे. माझे आई-वडीलनी मोलमजुरी करुन मला बीए पर्यंत शिक्षण दिलेले आहे. माझ्या व्यतिरिक्त घरात कोणीही नोकरीस नाहीत त्यामुळे घराची संपुर्ण जबाबदारी माझेवरच आहे. माझे कुटुंबात आई-वडील व लहान बहिण-भाऊ माझेवरच अवलंबुन आहेत. एक वर्षा पासुन मी निलंबीत असल्याने माझी आर्थिक परिस्थिती खुपच हालाकीची झालेली आहे. त्यात आपण मला सेवेतुन बडतर्फ का करण्यात येवु नये अशी कारणे दाखवा नोटीस दिल्याने माझी मानसीक स्थिती फारच नाजुक झाली आहे.

तरी मी वरील नमुद केलेल्या सर्व बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन मला कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित केलेली शिक्षा रदद् होवुन माझी विभागीय चौकशीतुन निर्दोष मुक्तता करणेत यावी ही कळकळीची नम्र विनंती आहे.

सोबत आवश्यक ती सहपत्रे सादर केली आहेत.

मा.सा.व्हावे.

(कमलेश बाळासाहेब पाटील )
पोलीस शिपाई ब.नं.४६६० ने. शिवाजी नगर
पोलीस मुख्यालय पुणे शहर.

मार्फतीने सादर -
राखीव पोलीस निरीक्षक,शि.नगर
पोलीस मुख्यालय पुणे शहर.

A-E -E-A6

- 6

जा.क्र.आस्था-१०/विचौ/पोना-८५०,डगळे
व पोशि.४६६०,पाटील/अं.आ./ 576/२०२०
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन
पुणे शहर,यांचे कार्यालय,पुणे-४११००१.
दिनांक - ०६ मार्च २०२०

वाचा-१.जा.क्र.आस्था-१०/विचौ/पोना.८५०-पोशि.४६६०/७५९/२०१९,दि.०९/०७/२०१९.
२)विभागीय चौकशी अहवाल जा.क्र/सपोआ/अभियान /विचौ/१३/२०२०,
दि.०८/०१/२०२०.
३)जा.क्र.आस्था-१०/विचौ/कादानो/पोना-८५०,डगळे व पोशि.४६६०,पाटील /१४०
/२०२० दि.२२/०१/२०२०.
४)रा.पो.नि.कार्यालय,मुख्यालय,जा.क्र.९७२/२०२०, दि.०५/०२/२०२०.
५)पोना.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील
सध्या-(निलंबित) यांचा दि.०६/०३/२०२० रोजी झालेला आज्ञांकित कक्ष.

---ooo---

**- अंतिम आदेश -**

०१. पोलीस नाईक.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे, व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,नेम-पोलीस मुख्यालय, पुणे शहर (सध्या-निलंबित) यांनी केलेल्या कसुरीच्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द संदर्भ क्र.१ अन्वये विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली होती.सदर विभागीय चौकशीकामी सहाय्यक पोलीस आयुक्त,अभियान,पुणे शहर यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले होते. त्याअनुषंगे सहाय्यक पोलीस आयुक्त,अभियान,पुणे शहर यांनी चौकशी पूर्ण करुन चौकशीची कागदपत्रे, समाकलन अहवाल व १ ते ९ नस्ती संदर्भ क्र.२ अन्वये इकडील कार्यालयास सादर केली आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

०२. <u>विभागीय चौकशीमध्ये पोलीस नाईक.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे, व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,(सध्या निलंबित)यांचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप -</u>

०१. तुम्ही, पोलीस नाईक.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे, व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,नेम-पोलीस मुख्यालय, पुणे शहर येथे नेमणुकीस असताना दिनांक ०३/११/२०१८ रोजी येरवडा जेल येथील आरोपी काढणेबाबतचे मागणीपत्रात १ आरोपी काढणेबाबत उल्लेख केला असताना व तुम्हास न्यायाधिन बंदीबाबत कर्तव्य नेमले असताना नमुद पोलीस कर्मचारी यांनी दोन आरोपी काढुन त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यास न्यायालयाची कार्यवाही झाल्यानंतर लॉकअपमध्ये जमा न करता मा.न्यायालयाची परवानगी नसताना, बेकायदेशीरपणे दुपारी १४:०० वा.नंतर, परस्पर आरोपी दिपक पाटील याचा मुलगा सिध्दार्थ पाटील याचे खाजगी चार चाकी वाहनातुन आरोपी दिपक पाटील यास त्याचे घरी करिष्मा सोसायटी कोथरुड, पुणे येथे घेवुन गेल्याची कसुर केली आहे.

०२. तुम्ही शासकीय सेवेत सचोटी व कर्तव्यपरायणता राखणे आवश्यक असताना, शासकीय सेवकास अत्यंत अशोभनीय वर्तन करुन महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम क्र.३ चे जाणीवपुर्वक

उल्लंघन केले आहे. तुम्ही जबाबदार पदी कर्तव्यास असताना शिस्तपालनाची अंमलबजावणी करण्यात गंभीर स्वरुपाची कसुर केली आणि शिस्तबध्द पोलीस दलाची प्रतिमा मलीन करणारे आणि पोलीस दलाच्या हितसंबंधास अपाय करणारी बेशिस्त, बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनिय असे गंभीर स्वरुपाचे वर्तन केले आहे.

०३. अशाप्रकारे तुम्ही पोलीस नाईक.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे, व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,नेम-पोलीस मुख्यालय, पुणे शहर (सध्या निलंबित) अत्यंत बेकायदेशीर, बेजबाबदार व पोलीस दलाची प्रतिमा मलीन करणारे गैरवर्तन केले आहे.

**<u>०३.चौकशीची कार्यवाही :-</u>**

१.अपचारी यांचा प्रथम जबाब नोंदविण्यात आला असून त्यांनी पहिल्या जबाबामध्ये दोषारोपाबाबत अखेरच्या निवेदनामध्ये सांगेन असे नमूद केले आहे.

२.विभागीय चौकशीमध्ये एकूण ०६ सरकारी साक्षीदार व जादाचे ०४ सरकारी साक्षीदार तसेच ०३ जादाचे खाजगी साक्षीदार तपासले आहेत.

३.अपचारी यांना तपासलेल्या सरकारी साक्षीदारांची उलट तपासणी घेण्याची संधी देण्यात आलेली आहे.

४.अपचारी यांना बचावाचे साक्षीदार देण्याची आणि त्यांची साक्ष नोंदविण्याची संधी देण्यात आली आहे.

५.अपचारी यांना बचावाच्या पूर्ण संधी,कालावधी,मदत व सवलती देण्यात आल्या आहेत.

६.अपचारी यांना विभागीय चौकशीचे अनुषंगाने कागदपत्रांच्या नकला व जबाबाच्या प्रती पुरविण्यात आल्या आहेत.

**<u>०४.चौकशीमधील निष्कर्ष :-</u>**

०१. अपचारी पोलीस नाईक.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे, व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,नेम-पोलीस मुख्यालय, पुणे शहर (सध्या निलंबित) हे मा.सत्र न्यायालय क्र.९, शिवाजीनगर न्यायालय पुणे या न्यायालयाकडील न्यायाधिन बंदी नामे १)विशाल शिंदे व २)दिपक पाटील या दोन न्यायाधिन बंदी यांचे दि.०३/११/२०१८ रोजी कोर्ट पेशीचे वॉरंट येरवडा कारागृह येथे इतर आरोपींचे वॉरंटाप्रमाणे पाठविण्यात आले होते त्याप्रमाणे येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथुन कैदी गाडी इंचार्ज पोलीस नाईक १९५० संतोष नेवसे, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे यांनी कैदी गाडीमधुन प्रथम ३९ आरोपी व नंतर दुसऱ्या कैदीपार्टीने ४ आरोपी शिवाजीनगर कोर्ट आवार लॉकअपमध्ये आणुन ठेवले होते. कोर्ट नं.९ येथे आरोपी नामे विशाल शिंदे या आरोपी करीता पोलीस कर्मचारी नामे १) पोलीस नाईक डगळे व २)पोलीस शिपाई विखे यांना डीओ पो.हवा.शेवाळे यांनी ड्युटीस नियुक्त केले होते,

०२. मा.न्यायालयाकडील वॉरंटावरुन आरोपी नामे दिपक पाटील हा जादा आरोपी येरवडा मध्यवर्ती कारागृहाकडुन कैदी गाडीतुन आलेला असल्याने पोलीस नाईक ८५० डगळे यांनी जादा आरोपी करीता परस्पर पोलीस शिपाई ४६६० पाटील यास घेवुन त्याबाबत कोर्ट आवार स्टेशन डायरीमध्ये नोंद केली असून त्याप्रमाणे पोलीस नाईक ८५० डगळे, पोलीस शिपाई ४६६० पाटील व पोलीस शिपाई १०७०४ विखे यांनी आरोपी नामे १)विशाल शिंदे व २)दिपक यशवंत पाटील यांना कोर्ट नं.९ मध्ये कोर्ट पेशीकरीता कोर्ट लॉकअप मधुन १२:२५ वा.ताब्यात घेतले व दोन्ही आरोपींना कोर्ट नं.९

येथे हजर करण्यासाठी घेवुन गेले त्यानंतर सदर आरोपीपैकी आरोपी नामे विशाल शिंदे यास दुपारी १४:०० वा.चे सुमारास कोर्ट लॉकअपमध्ये जमा केले आहे.

०३. आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यास लॉकअपमध्ये जमा न करता मा.न्यायालयाची परवानगी नसताना, सदर आरोपीस दि.०३/११/२०१८ रोजी दुपारी १४:०० वा.नंतर, परस्पर आरोपी दिपक पाटील याचा मुलगा सिध्दार्थ पाटील याचे खाजगी चार चाकी वाहनातुन आरोपी दिपक पाटील यास त्याचे घरी करिष्मा सोसायटी कोथरुड, पुणे येथे घेवुन जात असताना यातील साक्षीदार कॅ.अतुल वासुदेव दिवेकर, यांनी पोलीस नियंत्रण कक्ष पुणे येथे फोन करुन सदर घटना कळविली असुन पोलीस नाईक ८५० डगळे व पोलीस शिपाई ४६६० पाटील यांनी त्यांचे ताब्यातील आरोपी दिपक पाटील यास त्याचे घरी करिष्मा सोसायटी कोथरुड पुणे येथे घेवुन आले त्या दरम्यान पोलीस नियंत्रण कक्ष यांचेकडुन अलंकार पो.स्टे. येथे दिलेल्या कॉल प्रमाणे अलंकार पो.स्टे.कडील पोलीस उप निरीक्षक श्री.शिनगारे व इतर पोलीस कर्मचारी यांनी आरोपी दिपक पाटील याचे घरी जावुन अपचारी पोलीस कर्मचारी व आरोपी दिपक पाटील यास अलंकार पोलीस स्टेशन, पुणे येथे आणले असुन त्यानंतर आरोपी दिपक पाटीस यास कोर्ट आवार लॉकअपमध्ये जमा केले आहे.

०४. अशाप्रकारे पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर(सध्या निलंबित) यांनी अत्यंत बेकायदेशीर, बेपर्वा, बेशिस्त, बेजबाबदार, निष्काळजीपणा व पोलीस दलाची प्रतीमा मलीन करणारे गैरवर्तन केले आहे.

## ०५.अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,पुणे शहर यांचे समाकलन :-

विभागीय चौकशी अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, अभियान, पुणे शहर यांनी सादर केलेल्या सदर विभागीय चौकशीमधील नस्ती क्र.१ ते ९ मधील जबाब,पुराव्याची कागदपत्रे व समाकलन अहवालाचे मी बारकाईन अवलोकन केले असता, अपचारी पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर(सध्या निलंबित) यांना बचावाच्या पूर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. विभागीय चौकशीमध्ये ठेवण्यात आलेले दोषारोप अ.क्र.०१ ते०३ सिध्द झाल्याचा जो निष्कर्ष काढलेला आहे, त्या निष्कर्षाशी मी पूर्णपणे सहमत आहे.

अशाप्रकारे तुम्ही पोलीस नाईक.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,नेम-पोलीस मुख्यालय, पुणे शहर (सध्या निलंबित) अत्यंत बेकायदेशीर, बेजबाबदार व पोलीस दलाची प्रतिमा मलीन करणारे गैरवर्तन केले आहे.

०६. तुमचे वरील कसुरी प्रकरणी, संदर्भ क्र.३ मध्ये नमूद कारणे दाखवा नोटीसद्वारे तुम्ही, पोलीस नाईक. ८५०/नामदेव दादाभाऊ डगळे, व पोलीस शिपाई.४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील,नेम-पोलीस मुख्यालय, पुणे शहर (सध्या निलंबित) यांना “ **शासकीय सेवेतून बडतर्फ करणे. (Dismissal From Service)** ”या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देवून, सदर नोटीसला १० दिवसात खुलासा सादर करणेबाबत सुचित केले होते.तुम्ही संदर्भ क्र.४ अन्वये खुलासा सादर केलेला आहे. तसेच संदर्भ क्र.५नुसार आज्ञांकित कक्षात तुम्ही प्रस्तावित शिक्षेच्या अनुषंगाने कोणतेही समर्थणीय स्पष्टीकरण दिलेले नाही. सबब मी तुम्हाला खालीलप्रमाणे अंतिम शिक्षा देत आहे.ः

अशाप्रकारे अपचारी पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील दोघे नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर (सध्या निलंबित) यांनी बेकायदेशीर व बेशिस्त वर्तन करुन पोलीस दलाची प्रतीमा मलीन करणारे गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन केले असून, त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या व सिध्द झालेल्या दोषारोपाचे अनुषंगाने त्यांना मुंबई पोलीस अधिनियम (शिक्षा व अपिले) नियम १९५६ च्या नियम ३ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २५ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे शिक्षेचे अंतिम आदेश निर्गमित करीत आहे.

<u>अंतिम शिक्षा-</u>

७. मी, अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर, महाराष्ट्र पोलीस अधिनियम -१९५१ च्या नियम २५ प्रमाणे तसेच महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम-१९५६ मधील नियम ०३ मधील तरतुदीनुसार मला प्रदान असलेल्या अधिकारान्वये याद्वारे अपचारी पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील, दोघेही नेमणुक - पोलीस मुख्यालय, पुणे शहर (सध्या निलंबित) यांना **" शासकीय सेवेतून बडतर्फ करणे. (Dismissal From Service) "** ही शिक्षा देत आहे.

सदर आदेशाने जर तुम्ही व्यथित झाला असाल व तुमची अपिल करावयाची इच्छा असल्यास, सदरचे आदेश प्राप्त झाले पासून ६० (साठ) दिवसात योग्य मार्फतीने सदर शिक्षेविरुध्द तुम्ही मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडे अपिल करु शकता.

(अशोक मोराळे)
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन
पुणे शहर

जावक क्र. 1275
दिनांक 09/03/2020

प्रति,

१.पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर
२.पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील, नेमणुक पोलीस मुख्यालय, पुणे शहर

मार्फत-

राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय, पुणे शहर.

२/- सोबत सदर आदेशाच्या तीन प्रती जोडलेल्या आहेत. सदर आदेशाची मूळ प्रत पोलीस नाईक ८५० नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील, दोघेही नेमणुक - पोलीस मुख्यालय, पुणे शहर (सध्या निलंबित) यांना तात्काळ अदा करुन त्यांची दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून ती दुय्यम प्रत उलटटपाली या कार्यालयास पोहोच करावी.

प्रत, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, पुणे शहर.
सहायक पोलीस आयुक्त,मानवी संसाधन विभाग/प्रमुख लिपीक,आस्थापना शाखा-०३/
पोलीस नोटीस कार्यालय/लेखा शाखा/वेतन देयक लिपीक,पोलीस मुख्यालय,
आस्थापना-१०(२)(४)पोलीस मुख्यालय,पुणे शहर.- सेवापुस्तकामध्ये नोंदीकरीता.

ANE_XU_E-A7

6

पुणे दिनांक:- ०७/०४/२०२०

प्रति,

मा. अप्पर मुख्य सचिव,

महाराष्ट्र शासन गृहविभाग,

मंत्रालय,मुंबई.

**प्रतिवेदक:- माजी पोलीस शिपाई बक्कल नंबर ४६६० कमलेश बाळासाहेब पाटील,तत्कालीन नेमणूक, पोलीस मुख्यालय, पुणे शहर.**

**संदर्भ:-१)पोलीस उप-आयुक्त मुख्यालय, पुणे शहर यांचे कडीलजा.क्र.- पोउपाआ/मुख्या-२/आस्था-१०/विचौ/पोना८५०-डगळेपोशि४६६०पाटील /७५९/२०१९ दिनांक०९/०७/२०१९ अन्वये विभागीय चौकशी,आदेशीत.**

२) चौकशी अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त अभियान, पुणे शहरकडील समाकलनाचा अंतिम अहवाल.

**३) अप्पर पोलीस आयुक्त प्रशासन, पुणे शहरकडील क्रमांक आस्था/१०/(१)विचौ/कादानो /पोना८५०डगले,व पोशि४६६० पाटील१४०/२०२०** दिनांक २०/०१/२०२०**सेवेतून बडतर्फीची प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस.**

४) कारणे दाखवा नोटीसला सादर केलेले उत्तर दिनांक-

५)अप्पर पोलीस आयुक्त प्रशासन,पुणे शहर कडील अंतिम आदेश क्रमांक -आस्था१०//विचौ पोना८५० डगळे व पोशि ४६६० पाटील अं आ/३७६/२०२०दि,०६/०३/२०२० अन्वये सेवेतून बडतर्फ हि शिक्षा दिली.

P A Babar 7/4/2020

संयुक्त विभागीय चौकशी / प्रथम आपिल:

**१)पोलीस नाईक बक्कल नंबर ८५० नामदेव दादाभाऊ डगळे**

**२)पोलीस शिपाई ४६६० कमलेश बाळासो पाटील**

**दोघेही तत्कालीन नेमणूक पोलीस मुख्यालय,पुणे शहर यांना विभागीय चौकशीत "सेवेतून बडतर्फ" या दिलेल्या शिक्षे** विरुध्द **अपील असे,**

**(Dismissal from service)**ही शिक्षा दिली आहे. .सदरचे आदेश प्राप्त झाल्यापासून ६० दिवसात मार्फतीने गृहविभाग महाराष्ट्र शासन, मुंबई करण्याचे सुचविण्यात आले आहे. शिक्षेचे अंतिम आदेश मला दिनांक- ०९/०३/२०२० रोजी प्राप्त झाले असून मुदतीत अपील सादर करीत आहे.

माझ्या विरुद्ध संयुक्त विभागीय चौकशीत ठेवण्यात आलेलं दोषारोप व त्याचे खंडन खालील प्रमाणे आहे.

**दोषारोप (जोडपत्र -१)**

कर्तव्यार्थ बेशिस्त व बेजाजाबदार व शासकीय सेवकास अशोभनीय असे वर्तन की ज्यात पोलीस नाईक ८५० नामदेव डगळे,पोलीस शिपाई कमलेश पाटील, दोघे नेमणूक मुखयलय पुणेशहर, येरवडा जेल येथील आरोपी काढणे बाबतचे मागणी पत्रात (१)आरोपी काढणे बाबत उल्लेख केला असताना व त्यांनाही न्यायबंदी बाबत कर्तव्य नेमले असताना नमूद पोलीस कर्मचारी यांनी २) आरोपी काढून त्यापैकी आरोपी नामे दिपक यशवंत पाटील यास बेकायदेशीरपणे त्याचे राहते घरी घेऊन गेले बाबत कसुरी केली आहे.

अशा प्रकारे पोना ८५० डगळे,पोशि ४६६० पाटील यांनी शासकीय सेवेत सचोटी, कर्तव्यपरायनता राखणे आवश्यक असताना शासकीय सेवकास अशोभनीय असे वर्तन करून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तवणूक) १९७९ मधील नियम-३ चे जाणीव पूर्वक उल्लंघन केले. अशा प्रकारे पोना ८५० डगळे, पोशि ४६६० पाटील यांनी जबाबदारपदी कर्तव्याशी कार्यरत असताना शिस्तपालनाची अंमलबजावणी करण्यास गंभीर स्वरूपाची कसुरी केली आणि शिस्तबद्द पोलीस दलाची प्रतिमा

मालिन करणारे आणि पोलीसखात्याचे हितसंबांधास अपाय करणारी बेशिस्त बेजबाबदार , व शासकीय सेवकास अशोभनीय असे गंभीर स्वरूपाचे वर्तन केले.

सदरच्या संयुक्त विभागीय चौकशीमधील ८ सरकारीसाक्षीदार ४ जादाचे साक्षीदार चौकशी अधिकाऱ्यासमोर तपासण्यात आले.त्यांनी सरतपासणीमध्ये सांगितलेल्या मजुरी प्रमाणे मित्र अधिकारी यांनी उलटतपासणी घेतली तसेच चौकशी अधिकाऱ्याने फेर तपासणी घेतली तसेच चौकशी अधिकाऱ्याने फेर तपासणी घेतली त्यामध्ये कोणत्याही साक्षीदारांनी दोषारोपास पुष्टी देणारी हकीकत सांगितली नसल्याने, दोषारोप सिद्द करण्याचे उद्देशाने चौकशी अधिकाऱ्याने जादाचे ४ सरकारीसाक्षीदार तपासले. तरीही सदरचे संयुक्त विभागीय चौकशीत ठेवण्यात आलेले दोषारोप सिद्द झालेले नाहीत कोणाही साक्षीदाराने तसा ठोस पुरावा दिला नाही व तशी हकीकत सांगितलेली नाही. तसेच आमच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप निराधाव चुकीचे असल्याने सप्रमाणे सिद्द करण्यास आमच्या तर्फे ४ बचावाचे साक्षीदार तपासण्यात आले. माझ्यावरील विभागीय चौकशीत ठेवण्यात आलेले दोषारोप,सरकारी साक्षीदार,जादाचे साक्षीदारनी बचावाचे साक्षीदार यांनी कथन केलेल्या हकिकती नुसार माझेवर कोणताही दोषारोप सिद्द झालेला नाही, ही बाब चौकशी अधिकाऱ्याकडे आम्ही सादर केलेल्या बचावाचे अंतिमनिवेदनात मुद्दे निहाय सविस्तर आणि सप्रमाणे आमचा काडी **मात्र दोष नसल्याचे साक्षीदारांचे जाब-जबाबात पुराव्या वरून दाखवून दिलेले** असतानाही **चौकशी अधिकारीयांचे समोर साक्षीदारांचे जाबजबाब साक्षीजबाब चे दरम्यान सरकारी साक्षीदार** १) व २) यांचे जबाब माझ्या पक्षात मला आणि माझे मित्र अधिकारीयांना कल्पना न देता परस्पर नोंदविले त्यास मित्र अधिकारीयांनी आक्षेप घेऊन नियमानुसार अपचारीयांचे समक्षच सरकारी साक्षीदार तपासण्याचा अट्टाहास केल्याने तसे करण्यास चौकशी अधिकाऱ्यांना भाग पाडल्याने त्यांचा देह भाव दुखावला गेला व त्याच वेळी त्यांनी **"शेवटी अहवाल पाठविणे माझेच हातात आहे "** असा मला दम दिला होता .महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९९१ मधील प्रकरण मधील नियम प्रमाणे विभागीय चौकशीत साक्षीदारांची

तपासणी अपचारी यांचे उपस्थितीत होणे आवश्यक आहे. हे नियमनुसार दर्शविल्याने चौकशी अधिकारी यांनी त्या गोष्टीचा आकस धरून ,कोणताही दोषारोप सिद्द होत नसताना मोघमपणे दोषारोप सिद्द झाल्याचा अंतिम समारोपाचे अहवालात निष्कर्ष नोंदविला आहे. तसेच त्या अहवालास अप्पर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर. यांनी मोघमपणे सहमती दर्शविलेली आहे. दिनांक २२/०१/२०२० चे कारणे दाखवा नोटीस मधील अप्पर पोलीस आयुक्त, प्रशासन यांचे समाकलन अहवालात "दोन्ही अपचारी यांना न्यायालयीन बंदीबाबत कर्तव्य नेमले असता नमूद अपचारी कर्मचारी यांनी दोन आरोपी काढून घेतल्याचा चुकीचा निष्कर्ष समाकलनास नोंदविला आहे ". **प्रत्यक्षात पोलीस नाईक १९५० नेवसे यांनी येरवडा कारागृहातून एकूण-३९ आरोपी शिवाजीनगर कोर्टात हजर करण्यास आणले होते. व कोर्ट लॉकअप मध्ये ठेवले होते** त्यातील **१) विशाल शिंदे २) दिपक पाटील यांनाही कोर्ट पेशींचे वॉरंट होते .** व सदर आरोपीना कोर्ट पेशी करता शिवाजीनगर कोर्ट लॉकअप मधुन कोर्ट लॉकअप इन्चार्ज यांनी आमचे ताब्यात दिले आहे.

त्यामुळे मी येरवाडा कारागृहातून आरोपी दिपक पाटील यास बाहेर काढले हा दोषारोप माझ्यावर आजीबात सिद्द झालेला नाही. तरी चौकशी आधिकारी यांनी चुकीचे अनुमान काढून त्यानां सादर केलेल्या येरवडा मध्यवर्ती कारागृह लेखी आदेश जा क्र येमका /माअनि /२००५/३६७७/२०१९ पुणे दिनांक २०/०८/२०१९ याचा लेखी आदेश जोडुन सुध्दा माननिय अप्पर पोलीस आयुक्त प्रशासन पुणे शहर यांनी मला अवास्तव अत्यंत टोकाची शिक्षा देण्यात आलेली आहे.

या संदर्भात मी दिनांक २२/०२/२०२० चे कारणे दाखवा नोटीसचे उत्तरात व त्यापूर्वी चौकशी अधिकाऱ्याकडे सादर के आम्ही सादर केलेल्याबचावाच्या अंतिमनिवेदनात नमूद केलेली हकीकत पुन्हा एकवार सहानुभूतूपुर्वक विचार होण्यास तसेच प्रार्थमिक चौकशी,विभागीय चौकशी दरम्यानच्या नियम बाहयता त्रुटी अनियमितता याचा शासन परिपत्रकातील तरतुदी नियमावली व मार्गदशक तत्त्वे अप्पर पोलीस आयुक्त प्रशासन यांचेकडे रीतसर मांडून त्याचा विचार झालेला नसल्याने सदरची गंभीर अनियमितता आपल्या दृष्टिपथास आणीत आहे.

विभागीय चौकशी अधिकारी यांनी त्याचे समाकलन अहवालमध्ये नमुद केलेल्या मताशी मी अजीबात सहमत नाही कारण नमुद चौकशीतील सर्व सरकारी साक्षीदार व जादाचे सरकारी साक्षीदार यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, मी येरवडा जेलमधुन आरोपी दिपक पाटील व विशाल शिंदे यांना काढलेले नाही. तसेच येरवडा जेल प्रशासन कर्मचारी पो हवा लोंढे व पोलीस शिपाई चौधरी यांनी दिनांक ०३/११/२०१८ रोजी पो ना १९५० नेवसे याचे ताब्यात ३९ आरोपी दिले होते कोर्ट नं ९ चे दोन आरोपी विशाल शिंदे व दिपक पाटील यांना आणण्यात आले होते सदर बाबत येरवडा जेलकडील पत्र क्रमांक येमका/मा अ नि - २००५/३६७७/२०१९ दिनांक २०/०८/२०१९ कळविले आहे.त्याची छायाकींत सत्य प्रत सोबत सादर केली आहे. त्यामुळे सदर आरोपीस मी स्वताहुन जेल मधुन काढलेले नाही सदरची बाबत विभागीय चौकशीत चौकशी अधिकारी याच्या निदर्शनास आणुन देण्यात आली होती. असे असताना देखील चौकशी अधिकारी यांनी न्यायाची बाजु मांडणे उचीत होते परंतु त्यानी सदर दोषारोपा बाबत मौन बाळगुन दोषारोपास पृष्ठी देण्याची भुमिका घेतली आहे. व सत्य परस्थिती लपवलेली असल्याचे सिध्द होत आहे.

आरोपी दिपक पाटील यांस आम्ही परस्पर त्याचे राहते घरी घेवुन गेलो हा जो निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी काढलेला आहे तो मला अजिबात मान्य नाही.कारण आरोपी दिपक पाटील यांनी कोर्ट नं ९चे मा न्यायाल यांना विनंती केली होती की,माझी पत्नी आजारी असल्याने मला तीला भेटायचे आहे तरी आपण मला परवानगी दयावी अशी विनंती केली होती त्यावेळीस आरोपीस तुमच्या वकिला मार्फत लेखी अर्ज देण्यास सांगितले व कोर्ट जेवणासाठी उठुन गेले त्यावेळी न्यायालयानी त्याची विनंती मान्या केली आहे असा आमचा समज झाल्याने व आरोपी दिपक पाटील हा आम्हास वारंवार विनंती करत होता की मला माझ्या आजारी पत्नीस भेटण्यास घेवुन चला असे म्हणत होता.म्हणुन आम्ही कोर्ट आवारातील मुख्यालयाकडील पोलीस अधिकारी याच्या निदर्शनास सदर बाब आणुन त्याची परवानगी घेण्यासाठी कोर्ट आवारात आलो असता पोलीस निरिक्षक भोसले व मपोउप निरिक्षक थोरात हे तेथे हजर नसल्याने स्टेशन डायरी मध्ये पोनि भोसले हे दिनांक ३/११/२०१८ रोजी १५/३० वा नोंद क्र २५ येथे शिवाजीनगर कोर्ट कंपनी येथे हजर झाले म्हणुन नोंद आहे. व मपो उप निरिक्षक स्नेह थोरात या दिनांक ३/११/२०१८ रोजी नोंद क्र २८ मुख्यालयातील कामसंपवुन चक्कर येवु लागल्याने दुपारी ०१/३० वा निवास्थानी गेल्याची नोंद आहे. त्याची सत्य प्रत सोबत जोडली आहे.डीओ शेवाळे याचेकडे सदर आरोपीस घेवुंन गेलो होतो कारण डीओ शेवाळे यांचे यांचे तोडी आदेशाप्रमाणे कोर्ट कंपनीचे दैनदिन कामकाज चालते

म्हणुन आम्ही डीओ शेवाळे यांना सदरची हकिगत कथन करुन व समक्ष आरोपीने डी ओ शेवाळे यांना विनंती केल्याने शेवाळे यांनी तोंडी परवानगी दिल्याने आम्ही नमुद आरोपीस त्याचे राहते घरी घेवुन गेलो होतो आरोपी पळुन जावुन नये म्हणुन पो शि पाटील याचे हातात बेडीची एक बाजु व दुसरी आरोपीच्या हातात आडकविण्यात आली होती तसेच रस्सीने देखील बाधण्यास आली होते वरील सर्व घटना सरकारी साक्षीदार व जादाचे साक्षीदार यांनी देखील विभागीय चौकशी दरम्यान साक्षीमध्ये कथंन केलेले आहे.असे असताना देखील चौकशी अधिकारी यांनी मी वरील आरोपीस त्याच्या राहते घरी परस्पर घेवुन गेला हा काढलेला निष्कर्ष चुकीचा आहे तरी आपण मी वरील प्रमाणे सादर केलेल्या सर्व घटनाचा बारकाईन अभ्यास केल्यास आपल्या निदर्शनास येईल की आरोपी दिपक पाटील यांस आम्ही आमच्या अधिकारात त्याचे रहाते घरी घेवुन गेलेलो नव्हतो हे सिध्द होत आहे.

विभागीय चौकशीत माझ्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपात दिनांक, वेळ,व्यक्तीचा तपशील नमूद नाही.

१]अपचारी यांना येरवडा कारागृहातून एक आरोपी काढण्यास कोणी लेखी आदेश दिले

२] आरोपीचे नाव काय आरोपी कोणत्या गुन्हयातील आहे.

३] त्यास कोठे हजर करायचे.

४] तसेच प्रत्येक्षात येरवडा कारागृहातून अपचारी यांनी किती व कोणा आरोपीस बाहेर काढले याचा कसलाही तपशील नाही.

**विभागीय चौकशी नियम १९८१ मधील परिच्छेद ६ मधील नियम ६.४ [redacted] [क] चा पूर्णपणे भंग झाला आहे. आणि असा मोघम दोषारोप सिद्द झाल्याचा अनुमान काढून टोकाची शिक्षा देणे हि नैसर्गिक न्यायतत्वाची पायमल्ली आहे, तसेच दोषारोप मोघम नसावा आणि त्या वर आधारित शिक्षा नियम विरुद्ध आहे या अनियमिततेचा लाभ अपचारी यांना मिळावा.**

३] निलंबित कर्मचाऱ्यांची तीन महिन्यात दोषारोप बजावणे आवश्यक आहे व त्यापुढे त्यांना निलंबनाच्या ठेवता येणार नाही असे महाराष्ट्र शासनाचे आदेश आहे, त्याचा भंग झाला आहे.

माझ्या वरील दोषारोपातील कथित घटना दिनांक ०३/११/२०१८ असल्याने तेंव्हा पासून सेवेतून निलंबित करण्यात आले मात्र प्रत्यक्षात विभागीय चौकशी दिनांक ०९/०७/२०१९ रोजी आदेशित होऊन मला दोषारोप ऑगस्ट मध्ये बजावण्यात आले. तरीही निलंबन केल्या पासून ३ महिन्यात दोषारोप बजावण्यात आले नाही.९ महिने विलंब लावला मात्र शासन नियम व परिपत्रक अर्ज सोबत देऊन सुद्धा निलंबन रद्द केले नाही, व कर्तव्यावर हजर करून घेतले नाही.

**महारष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडे परिपत्रक क्र नियम क्र आ/११२८/प.क्र.११/११अ दिनांक०९/०९/२०१९ मधील शासन निर्णयास हरताळ फासला तसेच सन्माननीय सर्वोच्च न्यायालय दिल्ली कडील न्यायनिवाडा अजयकुमार चौधरी विरुद्ध भारत सरकार सिविल अपील नंबर १ निलंबित कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी कोणत्याही परिस्थितीत ६ महिन्यात पूर्ण होणे आवश्यक आहे** आणि त्यापुढील मुदतवाढ गृहविभाग मंत्रालय,मुंबई कडून घेणे आवश्यक असताना व आमच्यावर कोणताही गुन्हा दाखल नसताना अप्पर पोलीस आयुक्त प्रशासन यांनी गंभीर नियमबाय्यता केली आहे, अपचारी यांना निलंबनातून ३ महिन्या नंतर पुनर्स्थापित केलेले नाही व सक्षम अधिकाऱ्या कडून मुदतवाढ घेतलेली नाही. **विभागीय चौकशी नियम १९९१ मधील प्रकरण ३ मधील कलम ३ मधील १९ नुसार विभागीय चौकशी ६ महिन्यात पूर्ण होणे आवश्यक होती.**

तसेच पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई कडील परिपत्रक क्र. पोमस-११/२२/०६/२५२/२०१२ दिनांक-१०/०२/२०१६ मधील तरतुदीचा भंग झाला असल्याने त्याचा लाभ मला मिळावा.

**५]अप्पर पोलीस आयुक्त प्रशासन पुणे शहर यांनी शिक्षे च्या आदेशापूर्वी सुनावणी(आज्ञांकिक कक्ष) दिली, मात्र आम्हाला** आमचे **म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही दिनांक ०६/०२/२०२० रोजी आज्ञांकिक कक्ष घेण्यात आला व माझ्या १९ वर्ष केलेल्या खडतर सेवेचा** व मिळालेल्या बक्षिसाचा **थोडापण विचार करण्यात आला नसून आम्हाला** विभागीय चौकशीच्या अहवालाचा कोणताही अभ्यास न करता जाणुन बुजुण

**त्याच दिवशी बडतर्फ करण्यात आले, व जीवनातून** माझे कुंटुब व मला **उठवणारी शिक्षा दिली.**

शिक्षेच्या अंतिम आदेशापूर्वी मला सुनावणी दिल्याचे आभास करण्यात कारण प्रत्यक्षात माझे म्हणणे ऐकून घेतले नाही. माझ्या सेवेच्या कालावधीचा कोणताही विचार केला नाही अशा प्रकारे महाराष्ट्र शासन,गृहविभाग,मुंबई कडील परिपत्रक पीडीई/०८९८/७०९/पोट कलम-६बी दिनांक २०/१०/१९९८ मधील सूचना नजरे आड करून शिंक्षा दिली.

६]माझे ताब्यातील आरोपी नामे दीपक यशवंत पाटील याची शिवाजी नगर न्यायालयात पेशी झाल्या दरम्यान त्याने कोर्टास विनंती करून आजारी पत्नीस भेटण्यास परवानगीस्तव विनंती केली होती मा.कोर्टाने त्यास त्यांच्या वकीलमार्फत अर्ज करण्यास सांगितले व आम्हाला त्याचे पत्नीस १० मिनिट भेटु दया असे कोर्टाने तोंडी सांगितले होते त्यामुळे आरोपीस आजारी पत्नीस भेटण्याची परवानगी मंजूर झाली असे वकिलाने सांगितले व सदरची हकिगत आम्ही वरिष्ठ अधिकारी हजर नसल्याने कोर्ट कंपनी डी ओ शेवाळे यांना सांगितली व आरोपीने ही कोर्टाने परवानगी दिली आहे माझ्या पत्नीस भेटण्याची विनंती आरोपी यांनी कोर्ट कंपनी डिओ यांना केली. तसेच दिनांक ०३/११/२०१८ रोजी आरोपीस येरवडा कारागृहात जमा करण्याच्या दरम्यान त्यास पळून जाण्यास वाव मिळू नये याची पुरेपूर काळजी घेतली, व त्यास बेडि रस्सीने बांधले व त्याचा मागे दक्षतेने उभा राहिलो तसेच कोर्टाने तोंडी परवानगी दिली व कोर्ट कंपनी डिओ यांनी सांगितल्याने आरोपी यास आजारी पत्नीस भेटण्यास कोथरूड येथील त्याचे निवासस्थानी अल्प काळ नेले असता कोणी तरी नियंत्रण कक्ष पुणे शहर यांना कळविल्याने अलंकार पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक शिनगारे हे त्या ठिकाणी आले त्यांनी सदरची परिस्थीती पाहिली व आम्ही त्याचे सोबत आरोपीस पोलीस स्टेशन ला घेवुन आलो एकंदरीत आरोपीस त्याचा आजारी पत्नीस केवळ कोर्टाचा तोडी आदेश व डिओ यांच्या आदेशामुळे व माणुसकी म्हणून भेटवण्यास त्यास पूर्ण जायबंदी करून नेले होते केवळ कोर्टाचा तोडी आदेश व माणुसकी मानवता दृष्टिकोनातून सदरची घटना घडली आहे.

तसेच पोलीस आयुक्त कार्यालयात कर्मचाऱ्यांना मानवतावादी (भावनिक प्रज्ञावंत पोलीस) प्रशिक्षण देण्यात येते त्यातही आरोपीशी सौजन्याने वागावे, मानवता दृष्टिकोन ठेवून वर्तन करण्याच्या वरिष्ठांचा सूचना आहेत.कोणत्याही व्यक्तीस जो पर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही तो पर्यंत गुन्हेगार म्हणता येत नाही. असे न्यायालयाचे आदेश आहे.त्यामुळे

यामध्ये माझी कसलीही कसूरी नाही कारण त्यादिवशी पोलीस निरीक्षक तसेच पोलीस उपनिरीक्षक शिवाजी नगर कोर्टात दुपारी हजर नसल्याने डिओ यांनी तोंडी परवानगी दिली होती, यासंपूर्ण घटनेत माझ्यावर कोणताही गुन्हा दाखल नाही.

**तरी यासंपूर्ण घटनेत माझ्यावर कोणताही** प्रकाराचा न्यायालयीन **गुन्हा दाखल नाही. उपरोक्त कथित कसुरीचा राई चा पर्वत करून अत्यंत टोकाची कठोर शिक्षा मा.अप्पर पोलीस आयुक्त,प्रशासन यांनी दिली आहे. महाराष्ट्र शासन गृहविभाग कडील परिपत्रक क्र.पीडीई/०८९८/७०९/पोट ६ दिनांक २०/१०/१९९८ मधील कसुरींचे प्रमाणात शिक्षा/सुसंगत शिक्षा बाबत तरतुदीचा विचार झालेला नाही.**

मी पोलीस आयुक्तालय पुणे शहर यांचे आस्थापनेवर दिनांक २०/०७/२०१६ मध्ये भरती झालो आहे मी दिनांक ०८/०५/२०१७ रोजी पोलीस शिपाई पदाची मुलभुत प्रशिक्षण नानाविज दौड येथे यशस्वीरित्या पुर्ण करुन मी शिवाजीनगर मुख्यालय पुणे येथे हजर झालो त्यानंतर मी ए कंपनी गार्ड डयुटीचे कर्तव्य बजावले आहे माझी सन २०१७ रोजी कोर्ट कंपनी येथे नियुक्ती करण्यात आली होती त्यानंतर दिनांक ०१/०१/२०१८ रोजी मा पोलीस आयुक्त मुख्याल पुणे शहर यांनी माझी निवड कॉऊन्टर इन्सरजेसी ऑफ ॲन्टी टेरीरीस्ट कोर्स (सी आय ए टी )शिताबर्डी नागपुर येथे पाठविण्यात आले होते सदरचा ४५ दिवसाचा खडतर कोर्स मी यशस्वीरित्या पुर्ण केला आहे त्याचे प्रमाणपत्र मला मिळालेले आहे त्याची छायाकींत प्रत सोबत सादर करण्यात आली आहे मी विविध राज्यात आरोपी पार्टी बंदोबस्त उत्कृष्टरित्या केलेला आहे तसेच पुणे जिल्हातील कायदा व सुव्यवस्था राखणे कामी मी महात्वाचे बंदोबस्त प्रमाणीक पणे पार पाडले आहेत माझ्या सेवा काळात मला अदयाप पर्यन्त एकही शिक्षा दिलेली नाही. मी पुणे जिल्हातील शिरुर तालुक्यातील ग्रामीण भागातील रहिवाशी आहे माझे आई वडिलानी मोलमजुरी करुन मला बीए पर्यन्तचे शिक्षण दिलेले आहे माझ्या व्यतिरीक्त घरातकोणीही नोकरीस नाही त्यामुळे घराची संपुर्ण जबाबदारी माझेवरच आहे. माझे कुंटंबात आई वडिल व लहान बाहिण भाऊ माझ्यावरच अवलंबुन आहेत दिड वर्षा

68

पासुन मी निलंबीत असल्याने माझी अर्थिक परिस्थीती खुपच हालाकीची झाली आहे त्यात आपण मला सेवेतुन बडतर्फ केलेले आहे.

तरी वरिल नमुद केलेल्या सर्व बाबीचा सहानभुतपुर्वक विचार करुन मला दिलेली शिक्षा रद्द होऊन माझी निर्दोष मुक्तता करणेत यावी ही कळकळीची नम्र विनंती आहे.

**करोना आजारामुळे सुविधा उपल्बध नसल्यामुळे आवश्यक लागनारे कादपत्र व पुरावे जोडले नाही ते नंतर जोडपत्रासोबत देण्याची तजविज ठेवली आहे.**

मा.सादर

मार्फतीने सादर

मा. अप्पर पोलीस आयुक्त,

प्रशासन, पुणे शहर..

Kपाटील
०७/०४/२०२०

[कमलेश बाळासाहेब पाटील,]

माजी **पोलीस शिपाई बक्कल नंबर ४६६०**

तत्कालीन नेमणूक-पोलीस मुख्यालय पुणे शहर

= -x -= A8

6

जा.क्र.आस्था-१०(विचौ)/अपील आदेश/पोना.८५०.डगळे व पोशि.४६६०.पाटील/ 1112 /२०२२
पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे कार्यालय
२,साधु वासवानी रोड, कॅम्प, पुणे-४११००१.
दिनांक - 28 / 06 / २०२२

संदर्भ-१)जा.क्र.आस्था-१०/विचौ//पोना-८५०,डगळे व पोशि.४६६०,पाटील/अं.आ./३७६/२०२०,दि.०६/०३/२०२०

२)कार्यासन अधिकारी,गृह विभाग,पोल-६ब,महाराष्ट्र शासन,मुंबई,यांचे शासन आदेश क्र.पीडीई.०९२०/प्र.क्र३५५/पोल-६ ब,दि.०७/०६/२०२२.

विषय-**अपिलावरील सुनावणीचे आदेशाबाबत.**

१)तत्का.पोना.क्र८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व

२)तत्का.पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील

दोघेही तत्कालीन नेमणूक-पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे शहर

---०००---

०२/- उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये तत्का.पोना.क्र८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व तत्का.पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील, दोघेही तत्कालीन नेमणूक-पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे शहर याचेविरुध्द् विभागीय चौकशीअंती त्यांना त्यांचे कसूरीबाबत " शासकीय सेवेतून बडतर्फ करणे " ही शिक्षा देण्यात आली होती.

०३/- तत्का.पोना.क्र८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व तत्का.पोशि. ४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांनी वरील शिक्षेविरुध्द् अपिल केले असता त्यांचे अपिलावर दि.२४/०२/२०२२ रोजी सुनावणी झाली आहे.सदर सुनावणीअंती संदर्भ क्र.२ मध्ये शासन आदेशान्वये, खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

०१.अपिलार्थी तत्का.पोना.क्र८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व तत्का.पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांचा अपिल अर्ज मान्य करण्यात येत आहे.

०२.अपिलार्थी तत्का.पोना.क्र८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व तत्का.पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांना शिस्तभंग प्राधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांचे जा.क्र.आस्था-१०/वि.चौ./पोना-८५०,डगळे व पोशि.४६६०,पाटील/अं.आ./३७६/२०२०,दि.०६/०३/२०२० अन्वये दिलेली " **शासकीय सेवेतून बडतर्फ करणे** " ही शिक्षा रदद् करुन त्याऐवजी " **देय वार्षिक वेतनवाढी ०३ वर्षे (परिणामकारक) रोखणे** " ही शिक्षा देण्यात येत आहे.

०३.वरीलप्रमाणे संबंधितांनी निर्णयाची अंमलबजावणी करुन शासनास त्वरीत अहवाल सादर करावा.

०४/- तत्का.पोना.क्र८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व तत्का.पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील यांना पोलीस आयुक्तालय,पुणे शहर कार्यालयाच्या आस्थापनेवर ते हजर होतील त्या दिनांकापासून कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत असून, त्यांची नेमणूक पोलीस मुख्यालय,पुणे शहर येथे करण्यात येत आहे.

०५/- संदर्भ क्र.२ मधील आदेशानुसार आस्थापना-०३ / आस्थापना-१० / वेतन देयक लिपीक, मुख्यालय व लेखा शाखा यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

(डॉ.जालिंदर सुपेकर)
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,
पुणे शहर.

प्रति,

१)तत्का.पोना.क्र.८५०/नामदेव दादाभाऊ डगळे
२)तत्का.पोशि.४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील

**मार्फतीने :-**

राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे शहर.

२/- मूळ प्रत तत्का.पोना.क्र.८५०/नामदेव डगळे व तत्का.पोशि.४६६०/कमलेश पाटील यांना अदा करून, दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून ती दुय्यम प्रत उलटटपाली या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-**

प्रमुख लिपीक,आस्थापना-०३ / लेखा शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर.

प्रमुख लिपीक,वेतन देयक शाखा, पोलीस मुख्यालय,पुणे शहर.

पत्रव्यवहार शाखा,पो.आ.कार्या.पुणे शहर / पोलीस नोटीस शाखा-प्रसिध्द्वीपत्रकासाठी.

आस्थापना-१० (२ व ४ )मुख्यालय,पुणे शहर - सदर शिक्षेची नोंद सेवापटात घेण्यात येवून शिक्षेची अंमलबजावणी करण्यात यावी, शिक्षेची अंमलबजावणी न झाल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल.

**प्रत सविनय सादर:-**

मा.अपर मुख्य सचिव,गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.

A - EXU - A9 71

गृह विभाग, मुख्य इमारत,
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र ०२२-२२०४८३२५. Email ID : deskpol६b.home.

---

कारणे दाखवा- नोटीस

क्रमांक: आरपीए ०९२२/प्र.क्र.५४९/पोल-६ब दिनांक: १३ जानेवारी,२०२३

प्रति,

१. पोलीस नाईक/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे,
नेमणूक पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे शहर
२. पोलीस शिपाई/४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील,
नेमणूक पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर पुणे शहर
(अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांचे कार्यालयामार्फत)

विषय:- कारणे दाखवा नोटीस-
सेवाबाहय कालावधी नियमित करणेबाबत.

संदर्भ:-१.क्र.आस्था-१०/विचौ/पोना-८५०डगळे व पोशि४६६०पाटील/अ.आ./३७६/२०२०, दि.०६.०३.२०२०
२. शासन आदेश क्र.पीडीई ०९२०/प्र.क्र.३५५/पोल-६ब, दि.०२.०६.२०२२
३. क्र.आस्था-१०(विचौ)/अपील आदेश/पोना८५०डगळे व पोशि४६६०पाटील/१११२/२०२२, दि.२८.०६.२०२२
४. आपले दिनांक २५/०८/२०२२ रोजीचे निवेदन.
५. जा.क्र. क्र.आस्था-१०(विचौ)/अपील आदेश/पोना८५०डगळे व पोशि४६६० पाटील/१९०४/२०२२/२५४९, दि.०१.११.२०२२

पोलीस नाईक/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोलिस शिपाई/४६६०/कमलेश बाळासाहेब पाटील, पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे शहर आपणास शिस्तभंग प्राधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांनी त्यांच्या दि. ०६.०३.२०२० च्या आदेशान्वये "शासकीय सेवेतून बडतर्फ करणे(Dismissal From Service)" ही शिक्षा बजावली होती. सदर शिक्षेविरुध्द आपण शासनास सादर केलेल्या अपिलावरील सुनावणी अंती आपणास शिस्तभंग प्राधिकारी यांनी बजाविण्यात आलेली उक्त शिक्षा रद्द करुन त्याऐवजी "देय वार्षिक वेतनवाढी तीन वर्षे(परिणामकारक) रोखणे" ही शिक्षा देण्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा मा. राज्यमंत्री(गृह-शहरे) यांनी घेतला. प्रस्तुत अपिलावरील सुनावणीचे आदेश संदर्भिय क्र.२ अन्वये संबंधित पोलीस घटक कार्यालयास निर्गमित करण्यांत आला आहे.

२. उक्त आदेशास अनुसरुन आपणास अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर कार्यालयाच्या क्र.आस्था-१०(विचौ)/अपील आदेश/पोना८५०डगळे व पोशि४६६०पाटील/१११२/२०२२, दिनांक २८.०६.२०२२ अन्वये सेवेत पुन:स्थापित करण्यांत आले आहे. त्यानुसार आपण दि. २९.०६.२०२२ रोजी पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे कर्तव्यावर हजर झाला आहात.

३. शिस्तभंग प्राधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांच्या दि. ०५.११.२०१८ च्या आदेशान्वये आपणास निलंबित करण्यात आले होते आपण दोघेही निलंबनाधिन असतानांच दि.०६.०३.२०२० च्या आदेशान्वये आपणास "शासकीय सेवेतून बडतर्फ करणे(Dismissal From Service)" ही शिक्षा बजाविण्यात आली होती.

४. उक्त नमूद वस्तुस्थिती व अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांनी संदर्भिय क्र.५ अन्वये सादर केलेल्या माहितीनुसार परिगणणेअंती आपला निलंबन कालावधी दिनांक ०५.११.२०१८ ते दि. ०५.०३.२०२० व सेवाबाहय कालावधी दिनांक ०६.०३.२०२० ते दि. २८.०६.२०२२ असा येतो.

५. आपणास शिस्तभंग प्राधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर यांनी बजावलेली “शासकीय सेवेतून बडतर्फ करणे(Dismissal From Service)” ही शिक्षा अपिलावरील सुनावणी अंती अपिलीय प्राधिकारी तथा मा. राज्यमंत्री(गृह-शहरे) यांनी रद्द करुन त्याऐवजी “देय वार्षिक वेतनवाढी तीन वर्षे(परिणामकारक) रोखणे” ही शिक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजेच आपणास पूर्णत: दोषमुक्त करण्यात आलेले नाही. सदर बाब विचारात घेता आपणास संपूर्णत: दोषमुक्त करण्यात आले नसल्याने आपला निलंबन कालावधीसह सेवाबाहय कालावधी नियमित करण्यांसदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम,१९८१ मधील नियम ६८ व ७० (१)(ए)(बी) आणि (४)(५) मधील तरतुदी आकर्षित होतात.

६. त्याअनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने( नियम, १९८१ मधील नियम ६८ व ७० (१)(ए)(बी) आणि ७० (४)(५) अन्वये आपला दिनांक ०५.११.२०१८ ते दि. ०५.०३.२०२० पर्यतचा निलंबन कालावधी व दि. ०६.०३.२०२० ते दि. २८.०६.२०२२ पर्यतचा सेवाबाहय कालावधी खाली नमूद केल्यानुसार नियमित का करण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीस आपणास बजाविण्यात येत आहे.

अ) दिनांक ०५.११.२०१८ ते दि. ०५.०३.२०२० या निलंबन कालावधीकरीता अपिलार्थी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा, आणि निलंवन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने)नियम,१९८१ मधील नियम ६८ नुसार देय असलेले वेतन व भत्ते देण्यात यावे परंतु उक्त निलंबन कालावधी हा सेवानिवृत्ती प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ कामावर व्यतित केलेला कालावधी न मानता निलंबन कालावधी म्हणून गणण्यांत यावा.

ब) दिनांक ०६.०३.२०२० ते दि. २८.०६.२०२२ या सेवाबाहय कालावधीकरीता आपणास सेवेतून बडतर्फ केले नसते तर ते जेवढे वेतन व भत्ते मिळण्यास हकदार झाले असते त्याच्या ५०टक्के वेतन व भत्ते देण्यांत यावे परंतु उक्त सेवाबाह्य कालावधी हा सेवानिवृत्ती प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ कामावर व्यतित केलेला कालावधी न मानता सेवाबाहय कालावधी म्हणून गणण्यात यावा.

सबब, वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेली कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबत आपले अभिवेदन ही नोटीस प्राप्त झाल्यापासून ६० दिवसात शासनाकडे सादर करावे. विहित मुदतीत आपले अभिवेदन प्राप्त न झाल्यास आपणास कोणताही खुलासा करावयाचा नाही, असे गृहीत धरण्यात येईल व एकतर्फी निर्णय घेऊन शासनाला योग्य वाटतील असे आदेश काढण्यात येतील.

(अजित तायडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर पोलीस आयुक्त प्रशासन, पुणे शहर (दोन प्रतीसह) त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त कारणे दाखवा नोटीसीची मूळ प्रत पोलीस नाईक/८५०/नामदेव दादाभाऊ डगळे व पोलीस शिपाई/४६६०/ कमलेश बाळासाहेब पाटील, नेमणूक पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे शहर यांना देऊन ती प्राप्त झाल्याच्या संदर्भात जादा प्रतीवर त्यांची सही घेऊन सदर सहीची जादा प्रत शासनास सादर करावी.

२. निवड नस्ती/कार्यासन-पोल-६ब

ANNEXURE – A 10

73
146



परि.क्र. ४७

अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग

संक्षिप्त कारवाई

१. पोउपनिरी निलेश राजेंद्र मोकाशी, २. पोना ६४४२ मल्लीकार्जुन शिशैल स्वामी, ३. सपोफौ मेहबूब बापूखान मोकाशी, ४. पोशि ११९७ सुमित गणपत खुट्टे. सर्व नेम. फरासखाना पो.स्टे यांचे कसुरीबाबत.

संदर्भ :- १.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचेकडील पत्र क्र.पोउआ/परि- १/२६८३/२०२३ दि.०८/०६/२०२३

२.मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचेकडील जा.क्र.पोआ/याचक/फरासखाना७१-२०२३/२५३/२०२३ पुणे दि.२०/०६/२०२३

३. या कार्यालयाकडील जा.क्र.अपोआ/पप्राबि/याचक/२९६४/२०२३ दि.२७/०६/२०२३

४. या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.अपोआ/पप्राबि/कसुरी/कारदोना /पोउपनि-मोकाशी, सपोफौ-मोकाशी, पोना-६४४२-स्वामी, पोशि-११९७ खुट्टे/४३१८/२०२३ पुणे दि.०४/०८/२०२३

५.पोउपनि/निलेश मोकाशी, पोना/६४४२ एन.एस.स्वामी, सपोफौ/एम.बी.मोकाशी, पो.अंमलदार ११९७ सुमित खुट्टे सर्व नेम.फरासखाना पो.स्टे.कडील जा.क्र.८३३९,८३४०,८३४१,८३४२/२०२३ दि.२२/०८/२०२३ रोजी सादर केलेला खुलासा

---

दोषारोप:-

तुम्हांस, फरासखाना पोलीस ठाणे गुरनं ७१/२०२३ भादंवि कलम ४०६,४२० या गुन्ह्यातील आरोपींच्या शोधार्थ पश्चिम बंगाल राज्य येथे तपासकामी पाठविले होते. तुम्ही आरोपींच्या शोधार्थ तेथील स्थानिक पोलीसांची मदत घेतली. तुम्ही, आरोपी नामे (१) सौरभ प्रसन्नजीत माईत (२) संजय तपनकुमार जाना हे मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवून अटक केली. सदर दोन्ही आरोपींना संबंधित न्यायालयात हजर करुन त्यांचा ट्रान्झिट रिमांड मंजुर करुन घेतला.

सदर आरोपींना हावडा पुणे दुरंतो एक्सप्रेसने पुणे येथे घेवुन येत असताना तुमचे कायदेशीर रखवालीतून आरोपी नामे संजयकुमार तपनकुमार जाना हा शौचास जाण्याचे बहाण्याने चालत्या रेल्वेतून पळून गेला. त्याबाबत नागपुर लोहमार्ग पोलीस स्टेशन गु.र.नं. ५७१/२०२३ प्रमाणे दाखल आहे.

अशा रितीने तुम्ही कर्तव्यात निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केलेने आरोपीस पळुन जाण्यास संधी मिळाली आहे असे प्रकृत वर्तनी दिसुन येत आहे. या तुमच्या कर्तव्यातील निष्काळजीपणा बद्दल "पोउपनि/निलेश मोकाशी, सपोफौ/मेहबुब बापूखान मोकाशी, पोना/६४४२एम.एस.स्वामी, पोशि/११९७ सुमित गणपती खुट्टे सर्व नेम.फरासखाना पो.स्टे. यांना वार्षिक वेतनवाढ पुढील एक वर्ष कालावधीसाठी रोखण्यात का येऊ नये?" अशी शिक्षा प्रस्तावित करुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तुम्ही उपरोक्त कसुरीबाबत खुलासा सादर केला आहे.

तुम्ही उपरोक्त कसुरीबाबत सादर केलेला खुलासा अंशतः मान्य करुन पुढील देय वार्षिक वेतनवाढ "एक वर्षाकरिता का रोखण्यात येवू नये ?" या प्रस्तावित शिक्षेत बदल करुन मी खालील प्रमाणे शिक्षेचे अंतिम आदेश देत आहे.

आदेश :-

मी प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम २५ व २६ आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मध्ये दिलेल्या तरतुदींच्या अधिन राहुन तुम्ही कसुरदार १.पोउपनि/निलेश राजेंद्र मोकाशी, २.पोना/६४४२मल्लीकार्जुन श्रीशैल स्वामी, ३.सपोफौ/मेहबूब बापूखान मोकाशी, ४.पो.अंमलदार/११९७सुमित गणपत खुट्टे सर्व नेमणूक फरासखाना पो.स्टे.पुणे शहर तुमच्या विरुद्ध वर नमुद प्रमाणे सिध्द झालेल्या दोषारोपासाठी तुम्हास "सक्त ताकीद" ही शिक्षा देत आहे. सदर शिक्षेस अपील अनुज्ञेय नाही.

(signature) 6/10/23

( प्रविणकुमार पाटील )
अपर पोलीस आयुक्त,
पश्चिम प्रादेशिक विभाग [illegible]

-गोपनीय

फक्त खातेनिहाय उपयोगासाठी

# पोलीस आयुक्तालय, पुणे शहर
## पोलीस नोटीस

शुक्रवार २८ जुन २०२४ भाग- १ पान.१८७४

परि.क्र.१८१ १) प्राथमिक चौकशीबावत.

विभागीय चौकशी – ४ १) पोउपनि. दत्तात्रय सहदेव ढावरे, तत्का. नेम. कोर्ट कंपनी, पुणे शहर (निलंबित)

संदर्भ : १. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोर्ट कंपनी, मुख्यालय, पुणे शहर यांचेकडील जा.क्र.वपोनि/ कोर्ट कंपनी कार्यालय/२२३९/२०२४, दि.१६/०५/२०२४
२. सहाय्यक पोलीस आयुक्त, आस्थापना, पुणे शहर यांचेकडील प्रा.चौ.अहवाल जा.क्र. सपोआ.आस्था/प्राचौ./कसुरी/२२०/२०२४ दिनांक ०६.०६.२०२४
३ या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.विचौ.४/पोउपनि.ढावरे व इतर०२/कसुरी/ कादानो/ फा.क्र.१५/२०२४, ई.क्र. २०९३४८० दि २४/०६/२०२४
४. आपणाकडील दि.२६/०६/२०२४ रोजीचा खुलासा.

<u>थोडक्यात कसुरी :</u>

पोउपनि/दत्तात्रय सहदेव ढावरे, तुम्ही तत्का.नेम. कोर्ट कपंनी, पुणे शहर येथे नेमणुकीस असताना, कर्तव्यात खालीलप्रमाणे कसूरी केलेली आहे.

मा.अधिक्षक येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे यांच्याकडुन दिनांक ११/०५/२०२४ रोजी मा. प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी गुरुग्राम दिल्ली येथे बंदी नामे विशाल हर्षद शर्मा यास दिनांक १४/०५/२०२४ रोजी न चुकता मा. न्यायालयासमोर हजर करणे बाबत मागणीपत्र कोर्ट कंपनीच्या ईमेलवर पाठविण्यात आले होते. नमुद बंदीस मा.न्यायालयात उपस्थित ठेवणेकरीता तुमची नेमणुक करण्यात आली होती. दिनांक १४/०५/२०२४ रोजी मा. ईशा गर्ग सो. प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी गुरुग्राम दिल्ली यांच्या न्यायालयामध्ये बंदी क्र २३३५/२४ विशाल हर्षद शर्मा यास हजर केले. मा. न्यायालयाने त्यांना सदर बंदीस दिनांक २८/०५/२०२४ रोजी पुन्हा हजर करण्याचे लेखी आदेश दिल्याने व मा. न्यायालयाचे कामकाज पूर्ण झाले असल्याने तुम्ही बंदीसह दिल्ली येथुन दुरंन्तो एक्सप्रेस रेल्वेने मुंबई पर्यंत आले व त्यानंतर मुंबई येथुन डेक्कन क्विन रेल्वेने पुणे येथे येण्यासाठी निघाले होते. दिनांक १५/०५/२०२४ रोजी रात्री १७.३० ते १९.४५ या सुमारास घेगडेवाडी ते देहुरोड या दरम्याण रेल्वे आल्यानंतर बंदीस लघुशंकेस लागली असल्याने तुम्ही बंदीस शौचालयामध्ये घेवुन गेले होते. लघुशंकेस जाऊन आल्यानंतर बंदी हात व तोंड धुण्याकरीता वॉश बेसीन येथे गेला व हात धुवुन झाल्यानंतर तोंडावर पाणी मारत असताना वॉश बेसीन जवळील दरवाज्यातुन चालु रेल्वेतुन हाताला बेडी लावलेली असताना उडी मारुन पळुन गेला आहे.

एकंदरीत पोलीसांच्या ताब्यातुन बंदी पलायनाची घडलेली घटना ही अतिशय निंदनीय असुन, तुम्हास आरोपी पार्टी करिता देण्यात आलेल्या लेखी सुचना गांभियाने घेतलेल्या नाहीत. वरिष्ठांचे आदेशाचे पालन केले नाही. तुम्ही शिस्तपालनाची अंमलबजावणी न करता अत्यंत हलगर्जीपणे, बेजबाबदार व शासकीय सेवकास अशोभनीय असे वर्तन करुन कर्तव्यात कसुरी केलेचे प्राथमिक चौकशी अंती निष्पन्न होत आहे.

उपरोक्त कसुरी प्रकरणी संदर्भ क्र.०३ अन्वये तुम्हास " देय वार्षिक वेतनवाढ त्यापुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने दोन (०२) वर्ष कालावधीसाठी का रोखण्यात येवू नये " म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. या कार्यालयाच्या कारणे दाखवा नोटीसला तुम्ही संदर्भ क्र.०४ अन्वये खुलासा सादर केला आहे. तुम्ही सादर केलेला खुलाशाचे अवलोकन केले असता, तुमचा खुलासा अंशतः समाधानकारक असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे तुम्हास प्रस्तावीत केलेल्या शिक्षेत अंशतः बदल करून खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

<u>अंतिम आदेश :</u>

मी, अरविंद चावरिया, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम २५ आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील तरतुदीच्या अधिन राहुन, तुम्ही पोउपनि/दत्तात्रय सहदेव ढावरे, तत्का.नेम.कोर्ट कंपनी, पुणे शहर (निलंबीत) तुमचे वरील नमुद कसुरीच्या अनुषंगाने तुम्हास " एक महिन्याच्या पगाराचे १० % इतक्या दंडाची " शिक्षा देत आहे.

सदर शिक्षेमुळे तुम्ही व्यथित होत असाल तर, सदर आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांका पासुन ६० दिवसाच्या आत मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयामार्फत अपील करु शकता. सदरचे अपील दोन प्रतीत सादर करावे.

( अरविंद चावरिया )
अपर पोलीस आयुक्त, प्रशासन,
पुणे शहर

Scanned by CamScanner

75

ANNEXURE- A12

शुक्रवार २२ ऑक्टोबर २०२१ | भाग- १ पान.३०५०

परि.क्र. १३१ | निलंबनातुन मुक्त करुन सेवेत पुनःस्थापित केलेबाबत.

विभागीय चौकशी.

**आदेश :**

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक पोमसं/ १४-ए/६७/एमएम/६६९/२०११, दि.२७/०४/२०१३, जा.क्र.पोमसं/१४अ/६७/एमएम/२१/१३, दि.१८/ ०६/२०१३ व जा.क्र.पोमसं/११/२२/६/२५२/२०१३, दि.१०/०२/२०१६, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय नियमा-१११८/प्र.क्र.११/११अ, दि.०९/०७/२०१९ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार, पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यालयाचे आस्थापनेवर दि.२०/१०/२०२१ अखेर निलंबित असलेले एकुण ३७ पोलीस अधिकारी, अंमलदार व लिपिकांचे निलंबन प्रकरणांचे पुनर्विलोकनबाबत दि.२०/१०/२०२१ रोजी आढावा बैठक घेण्यात आली आहे.

सदर बैठकीमध्ये समितीने खालील नमूद पोलीस अधिकारी, अंमलदार व लिपिक यांना निलंबन मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे, त्यानुसार त्यांना त्यांचेविरुध्द असलेल्या न्यायालयीन/विभागीय शिस्तभंगविषयक कार्यवाहीच्या अधिन राहुन ते कर्तव्यावर हजर होतील त्या दिनांकापासुन निलंबनातून मुक्त करण्यात येत असून, त्यांना सेवेत पुनःस्थापित करण्यात येत आहे. तसेच त्यांची नेमणूक त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम व नाव | निलंबनाचा दिनांक | निलंबित करणारे अधिकारी | तत्कालीन नेमणूक | पुनःस्थापित केल्यानंतरची नेमणूक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोउपनि/सचिन प्रल्हाद निलाळकर | १८/०६/२०२१ | अपर पोलीस आयुक्त, प्रशासन | कोर्ट कंपनी | विशेष शाखा |
| ०२ | पोहवा/४८५५ बाळू रामचंद्र मुरकुटे | | | | मुख्यालय |
| ०३ | पोशि/२५८८ शरद नाथा मोकाशे | | | | मुख्यालय |
| ०४ | पोशि/२७३५ महावीर लक्ष्मण सामसे | | | | मुख्यालय |
| ०५ | पोशि/१७३० किशोर चंद्रकांत नेवसे | | | | मुख्यालय |
| ०६ | सफौ/प्रदीप रामचंद्र शिंदे | १६/०६/२०२१ | पोउपआयुक्त, गुन्हे | गुन्हे शाखा | मुख्यालय |
| ०७ | पोना/६७११ स्वप्नील अशोक बारटक्के | ०७/०९/२०२१ | पोउपआयुक्त, परिमंडळ-०३ | उत्तमनगर | मुख्यालय |
| ०८ | पोहवा/१७८ संभाजी रघुनाथ गायकवाड | २४/०९/२०२१ | पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-०३ | वारजे माळवाडी | मुख्यालय |
| ०९ | पोना/७८११ महेश गंगाराम | | | | मुख्यालय |
| १० | पोशि/४१७६ विशाल तानाजी कदम | | | | मुख्यालय |

सासकीय - पुनःस्थापित करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी / अंमलदार न्यायालयीन/विभागीय शिस्तभंगविषयक कारवाई पूर्ण होईपर्यंत राजीनामा, स्वेच्छा सेवानिवृत्ती वगैरे म्हणजे [illegible] घेता येणार नाही. निलंबन कालावधी गुन्ह्याचा निकाल/विभागीय चौकशी/ शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा — झाल्यानंतर नियमित करण्यात येईल.

निलंबन आढावा समितीचे मान्यतेने.